परस्परं भावयन्तः
म प्र

मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र
# हितगुज

**अंक ९६ ✦ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ डिसेंबर २०१३**

**वेबसाईट : www.marathepratishthan.org ✦ ई मेल : maratheparivar@yahoo.co.in**

**(फक्त खाजगी वितरणासाठी)**

## संपादकीय



प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार हितगुजचा डिसेंबर २०१३ सालातील हा शेवटचा अंक. पुढील अंक २०१४ सालातील मार्च महिन्यात निघेल. नवीन वर्ष सर्व मराठे परिवाराला सुखाचे जावो या शुभेच्छा!

गेल्या वर्षी डिसेंबर २०१२ हितगुजच्या अंकात दोन फॉर्म जोडून हितगुज या पुढेही सुरू राहावं का?, हितगुजचे सातत्याने प्रकाशन होण्यास 'स्वारस्य' आहे का नाही आणि हितगुज चालू राहून आपल्या घरी यावे म्हणून वाढीव वर्गणी २०००रु. पाठवून द्यावी असे प्रिय सभासदांना मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाने आवाहन केले होते.

त्या आवाहनास थोडा प्रतिसाद मिळाला. एकूण चारशे कुलबांधवांनी हितगुजची वर्गणी भरली म्हणून ४०० अंक प्रकाशित होऊ लागले. यापूर्वी ११०० अंक प्रकाशित होत होते. ही खेदाची गोष्ट वाटते.

हितगुज हे एक माध्यम आहे. समस्त मराठे परिवाराला जोडणारे हे एक साधन आहे. आज 'हितगुज'चे प्रकाशन बंद पडले नाही यातच आनंद मानायचा का? हितगुज तग धरून आहे त्याला जीवदान मिळाले म्हणून केवळ समाधान मानायचे का?

डॉ. सुनील यशवंत मराठे, माणगाव (जि.रायगड) दिनांक ७ जानेवारी २०१३ला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, 'हितगुज बंद करू नये, कृपया अशी वेळ येऊ नये, येणार नाही, दुर्दैवाने आल्यास कोणत्याही सदस्याचा हितगुज अंक बंद करू नये.' त्यांनी पत्रासोबत अकरा हजार रुपयाचा चेक ही हितगुजसाठी पाठविला. डॉक्टरसाहेबांच्या भावना आणि कळकळ आपण समजू शकतो. पण व्यवहार-आर्थिक व्यवहाराचे गणित कसे सोडवायचे? हितगुजचा खर्च कसा भागवायचा?

जागतिकीकरणाच्या काळात,

### ✻ निमंत्रण ✻

मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखेचा ३५वा वर्धापन दिन दिनांक २६ जानेवारी २०१४ रोजी आयोजित केला आहे. यामध्ये पुण्यातील गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांचा बक्षीस समारंभही होणार आहे. त्याचबरोबर खालील कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

१. श्री. गजानन मराठे यांचे वार्धक्य आणि गुंतवणूक या विषयावरील विवेचन

२. श्रीमती रोहिणी चक्रदेव यांचे कैलास मानस सरोवर दर्शन या विषयावरील मुलाखतीद्वारा प्रवासवर्णन

३. मराठ्यांची माहेरवाशीण सौ. मंदा देवधर व डॉ. सौ. सविता विवेक विद्वांस यांचे बहारदार सुगम संगीत

तरी या बहुरंगी कार्यक्रमास आपण सहकुटुंब, सहपरिवार आणि नातेवाईकांसमवेत उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

**: स्थळ :**

**वेदशास्त्रोत्तेजक सभागृह, स्पोर्टस ग्राऊंडसमोर,**
**विश्व-कल्पना हॉटेलजवळ, पेशवेपार्क चौक, पुणे ४११०३०**

**वेळ :**४.३० ते ८.००

◉ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे : ८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई-४०००३१ ◉
दूरध्वनी : २४१५०८८९ ◆ ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com
◆ अक्षरजुळणी : सौ. अनघा विवेक मराठे, ठाणे. फोन : ९८३३११११९०२ ◆

Marathe Pratishthan

धकाधकीच्या जीवनात, स्पर्धेच्या युगात आणि लेटेस्ट टेक्नॉलॉजीच्या फाजिल आहारी जाण्यात आपण 'धन्यता' मानायला लागलो नाहीत ना अशी शंका येऊ लागली आहे. प्रेमाचा आणि विश्वासाचा भक्कम आधारच आपण काढून टाकत नाही ना? जग फार झपाट्याने बदलतंय, आपण स्वत:ला वेळीच बदलणे शहाणपणाचे आहे. काळानुरूप स्वत:ला बदलणे हे चांगलेपणाचे लक्षण आहे. तेव्हा सर्वांनी आत्मपरिक्षण करू या. सर्व कुलबांधवांनी आत्मचिंतन करण्याची वेळ आलेली आहे. 'मराठे प्रतिष्ठान'या संस्थेची वाढखुरटता कामा नये. आधीच्या पूर्वसुरींनी जो आधारवड लावला आहे त्याची निगा, जोपसना, संगोपन व संवर्धन एक आवश्यक कर्तव्य म्हणून बजावले पाहिजे.

त्यासाठी विचारविनिमय व प्रयत्न करणे गरजेचे आहे. संवाद साधला पाहिजे. आपापसातले मतभेद मिटवून संवाद वाढवला पाहिजे. आणि त्यासाठी एकत्र येणे, एकत्र जमणे आवश्यक आहे. दिनांक २६ जानेवारी २०१४ला मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेचा ३५ वा वर्धापनदिन आहे. पुण्यातील गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांचा बक्षीस समारंभही होणार आहे. त्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहू या.

मराठे प्रतिष्ठानचे सुरू असलेले उपक्रम बंद पडायला क्षणाचाही वेळ लागत नाही त्यासाठी काही कष्टही करावे लागत नाहीत. पुण्याहून नेमाने निघणारी डायरी (दैनंदिनी) अशीच बंद पडली. बरं, बंद केलेल्या उपक्रमाची जागा दुसरा कोणता नवा उपक्रम सुरू करून भरली जात आहे असेही दिसत नाही याचे वाईट वाटते. तेव्हा जे सुरू आहे त्यात सातत्य राखण्यास ते टिकवून धरण्यासाठी प्रयत्न करावे लागतात ते तुम्ही-आम्ही सर्व मराठे कुलबांधव-भगिनींना प्रयत्न करण्याचे बळ परमेश्वर आपल्याला देईल आणि मराठे परिवारातील प्रत्येक व्यक्ती जशी 'मोठी' आहे तशीच संस्था ही मोठी होईल, संस्थेची वाढआणि विकास जोमाने होऊन आहे त्यापेक्षा अधिक ती नावारूपाला यावी अशी सदिच्छा व्यक्त करते.

- आपली शुभचिंतक

**डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे, (पृ.१२०)**

८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई ४०० ०३१ दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९

**२५ नोव्हेंबर २०१३**

## 'हर हर मराठे'

*प्रिय प्रिया व श्रुती*

*मंगळवार दिनांक १० सप्टेंबर रोजी संध्याकाळी झी-मराठी वाहिनीवर 'एकापेक्षा एक अप्सरा आली' हा कार्यक्रम पाहत होतो. त्यावेळी त्या कार्यक्रमात निमंत्रित प्रवेश झाल्याबद्दल प्रियाचे स्वागत व कौतुक करत असताना 'आता या कार्यक्रमात दोन्ही संघात एक एक मराठे अप्सरा आहे' असा उल्लेख झाला व आपणा दोघींना रंगमंचावर बोलावले गेले. प्रवेश करताना आपण दोघींनी उत्स्फूर्तपणे 'हर हर मराठे' अशी आरोळी दिलीत. छान वाटले.*

*'मराठे प्रतिष्ठान' या सेवाभावी संस्थेचा अध्यक्ष या नात्याने मी आपणा दोघींचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन करतो व प्रतिष्ठानला 'हर हर मराठे' हे घोषवाक्य दिल्याबद्दल आभार मानतो.*

*आपणा दोघींना असेच सुयश चिंतितो*

आपला

रमाकांत विद्वांस (पृ. ६२३)

**साभार पोच**

## बेस्ट मिसळ

लेखक : **कै. गजानन भास्कर मराठे (पृ. ४२७)** * प्रकाशक : श्रीमती रोहिणी गजानन मराठे

सी ४/२, कॅश्युरिना सहकारी वसाहत, बेस्ट बसडेपोजवळ, घाटकोपर (पू.) मुंबई ४०० ०७५

मोबाईल : ०९९६९७४६६८६ दूरध्वनी : -०२२-२५००४९०७

देणगी मूल्य : २२० रु. * पृष्ठसंख्या : १६४

कै. गजानन भास्कर मराठे (पृ. ४२७) स्मृतीदिन २२ डिसेंबर २०१२ मराठे प्रतिष्ठानद्वारा विनम्र श्रद्धांजली



Marathe Pratishthan

# कैलास मानससरोवर यात्रा

श्री. आनंद मराठे

## रविवार १९-८-२०१२

जानेवारी २०१२ ला लोकसत्तेमध्ये कैलास मानससरोवर यात्रेची संपूर्ण पानभर जाहिरात आली होती. ती जाहिरात भारत सरकारतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या यात्रेची होती. संपूर्ण यात्रा साधारणपणे तीस दिवसांची असून यात्रेपूर्वी दोनदा दिल्ली व गुंजी येथे वैद्यकीय तपासणी केली जाते. त्या तपासणीत अनफिट ठरल्यास त्या व्यक्तीला यात्रेत सहभागी केले जात नाही.

मला ऑफिसमधून तीस दिवस सलग रजा मिळणे शक्यच नव्हते, त्यामुळे मी इतर ऑपशन्स शोधू लागलो. एवढी लांबची व खडतर यात्रा असल्यामुळे प्रथितयश ट्रॅव्हल कंपनीबरोबर करावी असे मी ठरवले. सचिन ट्रॅव्हल्सच्या तारखा मला जमत नव्हत्या. त्यामुळे मी केसरी ट्रॅव्हल्सकडे चौकशी केली व १९ ऑगस्टला सुरू होणारी त्यांची कैलास मानससरोवर यात्रा करण्याचे ठरवले.

आज सकाळी घरून निघताना प्रचंड पाऊस पडत होता. साडेपाचच्या सुमारास मी मुंबई एअरपोर्टवर पोहोचलो. लीना मला सोडायला आली होती. केसरीने अगोदर सांगितल्याप्रमाणे त्यांनीच दिलेली ड्युफेल बॅग, सॅक, पाऊच एवढे तीन डाग होते. असिस्टंट टूर मॅनेजर महेश साळवीने माझे स्वागत केले. हळूहळू केसरीचे इतर सहप्रवासी जमू लागले. त्यांच्याकडे असलेल्या ड्युफेल बॅगेमुळे ते कैलासला चालले आहेत हे ओळखून येत होते. थोड्याच वेळात टूर मॅनेजर प्रशांत सावे, ज्याच्याबद्दल खूप ऐकले होते. त्यांची ओळख झाली.

जेट एअरवेजचे ९वॅट-३३३ विमान मुंबईवरून दिल्लील१ जाण्यासाठी वेळेवर सुटले. माझ्या बाजूला बुलढाण्याचे काटे बसले होते. दिल्लीला उतरल्यावर आम्ही इमिग्रेशनचे सोपस्कार पार पाडून जेट एअरवेजच्या ९डब्ल्यू २६२जे दिल्लीहून काठमांडूला पोहोचले. विमानात टायगर ब्रँड बीअर देत होते. आमच्या केसरी मंडळींपैकी काही लोकांनी ती प्राशन केली.

काठमांडूचा त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळ छोटासा आहे. तो पाहून मला भारतातील राजकोट व जुन्या इंदूर विमानतळाची आठवण झाली. उतरल्यावर काही लोकांनी लोकल सिम कार्ड घेतले. मी वोडाफोन इंटरनॅशनल रोमिंग करून घेतला होता.

केसरीवाले जेव्हा इंटरनॅशनल टूर काढतात. त्या वेळेस ते त्या त्या देशाच्या लोकल ट्रॅव्हेल्सशी संपर्क साधतात व सर्व टुरसाठी त्यांची मदत घेतात. आमची पुढची सर्व व्यवस्था काठमांडूमधील सम्राट ट्रॅव्हल्स करणार होते. त्यांची बस आमचे स्वागत करण्यासाठी एअरपोर्टवर उभी होती. पुरुषोत्तमदास हा त्यांचा मॅनेजर होता. बसमध्ये बसल्यावर प्रशांतने आम्हाला आमची घड्याळे २० मिनिटे पुढे करायला सांगितली.

काठमांडूमध्ये त्यावेळेला खूप ट्रॅफिक होते जवळजवळ तासाभराने आम्ही सोल्टी काऊनी प्लाझा या फाईव्हस्टार हॉटेलमध्ये आलो. पुण्याचे चंद्रशेखर सपर माझे रुमपार्टनर होते. हॉटेलमध्ये आमच्यासाठी नाश्ता व चहा, कॉफीची व्यवस्था होती. त्यानंतर फ्रेश होऊन आम्ही सर्व एकमेकांशी ओळख करून घेण्यासाठी एकत्र जमलो. आमच्या ग्रुपमध्ये चार डॉक्टर्स आहे हे पाहून बऱ्याच लोकांना हायसे वाटले. पुण्याचे डॉ. सुहास माटे हे तर एव्हरेस्ट बेसकॅम्पपर्यंत जाऊन आले होते.

केसरीच्या प्रशांत व महेशने आम्हाला संपूर्ण यात्रेची माहिती दिली.

## सोमवार २०-८-२०१२

भल्या पहाटे उठून आम्ही हिमशिखरे पाहण्यासाठी काठमांडू लोकल एअरपोर्टवर गेलो. त्या ठिकाणी अनेक प्रायव्हेट एअरलाईन्स पंचेचाळीस मिनिटांनी टुर करतात. सकाळी एक विमान प्रथम सर्व्हे करण्यासाठी जाते व वातावरण स्वच्छ असेल तर सहा-सात विमाने प्रवाशांना घेऊन जातात. प्रत्येक प्रवाशाला खिडकी असते व कॉकपिटमध्ये जाऊनसुद्धा प्रवासी फोटोग्राफी करू शकतात. पण त्या दिवशी हवामान खराब असल्यामुळे हिमशिखरे दर्शन आमच्या नशिबात नव्हते. आम्ही ‘Yeti Airlines’ चे बुकिंग केले होते. या सहलीचा चार्ज रु. ५९०० होता. वातावरण खराब असल्यास पैसे परत करतात. खालील हिमशिखरे विमानातून बघता येतात. Lontang Lining, Dorije lakpa, गौरीशंकर, Nuptse, Lhotse, Amodoblam, Chomlong मकालू, कांचनजंगा व जगातील सर्वांत उंच शिखर सागरमाथा म्हणजेच एव्हरेस्ट (८८४८ मी./२९०२९फूट). एअरपोर्टवर मी नेपाळी नाण्यांची खरेदी केली. भारतीय एक रुपया नेपाळी एक रुपया साठ पैसे. ब्रेकफास्ट करून आम्ही काठमांडू दर्शनाला बाहेर पडलो. खोसे, लोकरे व धमाल या नवी मुंबई महानगरपालिकेत नोकरीला असलेल्या त्रिकुटाची ओळख झाली.

त्या दिवशी आम्ही काठमांडूमधील अतिशय प्रसिद्ध अशा पशुपतीच्या मंदिराला भेट दिली. पशुपतीनाथाला चार मुखे आहेत. देवळाच्या बाहेर एक मोठा नंदी असून तो सोन्याच्या पत्र्याने मढवलेला आहे. पशुपतीनाथ मंदिरातील मुख हे रेड्याचे आहे असे पौराणिक कथेत सांगतात व त्याची पाठी ही केदारनाथ येथे आहे. मंदिराच्या आवरात कालभैरव, हरिहर व झोपलेल्या शेषनागधारी विष्णू यांच्या मूर्ती आहेत. मंदिराच्या आवारात ५२५शंकराच्या छोट्या पिंडी आहेत. त्या प्रत्येक पिंडीला स्पर्श करून प्रदक्षिणा घालतात असे केल्याने सर्व योनींतून मुक्तता मिळते असे म्हणतात. मंदीर बागमती नदीच्याकाठी आहे. नदीच्या किनारी असलेल्या घाटांवर विशिष्ट ठिकाणी चिता जळत होत्या. दर्शन घेऊन झाल्यावर आम्ही साधे एकमुखी रुद्राक्ष व मोत्यांची खरेदी केली. त्यानंतर आम्ही बोधनाथ मंदीर म्हणजे बौद्ध धर्मिय पॅगोडा बघितला.

हॉटेलवर लंच करून म व सपरनी विश्रांती घेतली. बाकी सर्वजण खरेदी करण्यासाठी मार्केटमध्ये गेले होते. आम्ही मुंबई-पुण्यातच खरेदी केली होती.

त्या दिवशी डिनर करताना केसरीचा दुसरा ग्रुप जो कैलास मानसवरून परतला होता. त्यांचे

Marathe Pratishthan

अनुभव ऐकायला मिळाले. केसरीच्या नव्हे दुसऱ्या ट्रॅव्हल्सच्या गुजराती जोडप्याला तब्येत बिघडल्यामुळे मानस व कैलासला जाता आले नव्हते. त्यांनी आमच्या रुमवर येऊन चांदीचा नाग व त्रिशूल देऊन तो मानससरोवरात विसर्जन करण्याची मोठी जबाबदारी माझ्यावर सोपवली.

**मंगळवार २१-८-२०१२**

पहाटे पाच वाजता आम्ही काठमांडूवरून निघालो, कारण आम्हाला लवकरच नेपाळ-तिबेट बॉर्डरवर जायचे होते. वाटेत हॉटेल जिरोकिलो येथे आम्ही केसरीने दिलेला पॅक ब्रेकफास्ट केला. बॉर्डरच्या अगोदर हिमालयात रेस्टॉरंट येथे आम्ही जेवण केले. बऱ्याच लोकांनी तेथे असलेल्या एजंटकडून चायनिज करन्सी घेतली. युआन हे चायनाचे चलन आहे. १ युआन - ९.२० या भावाने तो युआन विकत होते. मी केसरीच्या ऑफिसमधून रु. ९.८० देऊन युआन विकत घेतले होते.

वाटेत मला महिंद्रा टू व्हिलरची शोरुम दिसली तसेच रस्त्यात बऱ्याच ठिकाणी महिंद्रची लोडकिंग व पीकअप मॉडेल्स दिसत होती. वाटेत इंदूमती, बोटी कोसी या नद्या लागल्या, सनकोशी हायड्रो पॉवर प्लँट लागला. दुपारी १२.३०च्या सुमारास आम्ही नेपाळ व तिबेटच्या कोदारी बॉर्डरजवळ पोहोचलो. जवळजवळ अर्धा कि.मी. चालत आम्ही बॉर्डर क्रॉस केली. आमच्या सर्व ड्युफेल बॅगज एकत्रितपणे चेकिंगसाठी गेल्या होत्या. तिबेटवर पूर्णपणे चीनचे वर्चस्व आहे. बॉर्डरवर नेपाळ व तिबेट यांना जोडणाऱ्या ब्रिजला फ्रेंडशिप ब्रिज असे म्हणतात. बॉर्डर क्रॉस करताना आमच्या ग्रुपमधील काही लोकांनी सामान वाहून नेण्यासाठी तिथे असलेल्या लहान मुलांची मदत घेतली.

बॉर्डर चेक पोस्ट येथे चीनचे Quaromtine/ Immigration/Customs यांचे होते. त्यावेळी चीनला अशी बातमी लागली होती की नेपाळमध्ये व्हायरल इनफेक्शन झाले आहे त्यामुळे हे पाण्याच्या बाटल्या व खाण्याचे पदार्थ बॅगांमधून शोधून बाहेर काढत होते. बोरिवलीचे श्री. फडके यांच्या बॅगमधून काही ड्रायफ्रूटसुद्धा बाहेर काढली. महेश साळवीच्या केसरी टुर्सच्या बॅगमधून सॉस व लोणच्याच्या बाटल्या बाहेर काढल्या. आमचा सर्वांचा ग्रुप व्हिसा काढला होता. आमचे लाईनीने पासपोर्ट चेक करून आम्हाला बॉर्डर पार करायला परवानगी दिली. गमतीचा भाग असा की कोणाच्याही पासपोर्टवर तेथे चीनचा शिक्का मारला गेला नाही. कॉमन व्हिसा फॉर्मवर तो मारला गेला. तिबेटवर वर्चस्व मिळविल्याचा ऑफिशियल रेकॉर्ड त्यांना ठेवायचा नसेल. इमिग्रेशन सेंटरच्या परिसरात फोटोग्राफी करू नये असे सक्त आदेश आम्हाला देण्यात आले होते. कैलास-मानससरोवर यात्रेसाठी येणाऱ्या प्रत्येक प्रवाशामागे चीनचे सरकार ९७४ युएस डॉलर म्हणजे जवळपास रु. ५०००० घेते. त्याच्या बदल्यात पूर्ण यात्रेसाठी चीनचा गाईड दारचेन व मानस येथे राहायची व्यवस्था केली जाते. १९६८ च्या भारत-चीन युद्धात तिबेटचा हा प्रदेश पं. जवाहरलाल नेहरू यांनी चीनच्या स्वाधीन केल्याचे सर्वांना यावेळी दुःख झाले. बॉर्डर क्रॉस केल्यावर आमच्यासाठी दोन बस व छोटी व्हॅन होती. या गाड्या लेफ्ट हँड ड्राइव्ह होत्या व चीनचे ड्राईव्हर त्या चालवत होते. केसरी ट्रॅव्हल्सच्या आमच्या तेहतीस जणांच्या ग्रुपमध्ये नेपाळमधील एक जोडपे व श्री. सूर्याजी सामील झाले. सूर्याजी म्हणजेच सूर्या हा एक मोठी आसामी होता. ते एकूण सात भाऊ असून विविध व्यवसायात कार्यरत होते. त्याचे काठमांडूमध्ये आरती नावाचे एकशे दहा रुमचे हॉटेल आहे. केसरीने जेव्हा नवीन कैलासची यात्रा सुरू केली होती. तेव्हा व्यवस्था आरती हॉटेलमध्ये करीत असत. आज आम्ही तिबेटमध्ये प्रवेश केला होता. प्रशांतने आम्हाला घड्याळे दोन तास पुढे करण्यास सांगितली.

नेपाळ-तिबेट बॉर्डरवर तिबेटमध्ये झाग्मा नावाचे गाव आहे. रस्ता अतिशय चिंचोळा असल्यामुळे थोडा ट्रॅफिक जाम झाला होता. मग मी बाहेरील ठिकाणांचे निरीक्षण करण्यास सुरुवात केली. बऱ्याच दुकानांमध्ये पूल टेबलवर लोक मनमुराद खेळत होते. 'नमस्त ब्युटी पार्लर' या दुकानावर बॉलिवूड अभिनेत्री अमृता रावचा फोटो लावला होता. बॉलिवूडची प्रसिद्धी तिबेटपर्यंत पोहोचल्याचे पाहून बरे वाटले.

साधारणपणे ४.२५ वाजता आम्ही न्यालम या गावी पोहोचलो. काठमांडू ते न्यालम अंतर १७० कि.मी. आहे. वाटेत ठिकठिकाणी चायनिज पोलीस चेकपोस्ट आहेत. न्यालममध्ये हॉटेल शिशपद्म येथे आम्ही थांबलो होतो. एका रुममध्ये पाच-सहा जण राहत होते. मी, सपर, फडके, लोकरे धमाल व खोसे एकत्र होतो. खोलीत सहा बेड व आमच्या सहा ड्यूफेल बॅगा ठेवल्यामुळे खोली एकदम भरून गेली. जेमतेम वावरायला जागा होती. खोलीत एकच पॉवरप्लग होता, त्यावर आळीपाळीने मोबाईल व कॅमेरा चार्ज करत होतो.

लोकरे व खोसे, धमाल यांना डॉक्टर म्हणत होते. केसरीच्या लिस्टमध्ये धमाल यांचा उल्लेख डॉक्टर असा केला नव्हता. ट्रीपला येताना त्यांनी बरीच औषधे आणली होती, म्हणून त्यांना डॉक्टर ही तात्पुरती पदवी दिली होती.

रात्रीच्या जेवणात पुरणपोळी होती. ह्या पुरणपोळ्या केसरी माहीम येथून बनवून घेतात. व त्यांच्या प्रत्येक टूरमध्ये त्या दिल्या जातात.

सम्राट ट्रॅव्हल्सचे सहा-सात जण आमच्या-बरोबर होते. अमृत हा हेड कूक होता व मोती त्यांचा म्होरक्या होता.

त्या रात्री आम्ही न्यालम येथे मुक्काम केला. न्यालम हे समुद्रसपाटीपासून ३७५० कि.मी. उंचीवरती आहे.

**बुधवार २२-८-२०१२**

आज आम्ही सर्वजण हॉटेलच्या मागच्या बाजूला असलेल्या एका टेकडीवर जाणार होतो ती ८०ती. कैलास-मानससरोवर यात्रेतील तो एक सरावाचा भाग होता. प्रशांतने प्रत्येकाला पाठीवर सॅक व त्याच्यात औषधे, थोडे खाण्याचे सामान व पाणी अशा आवश्यक वस्तू घ्ययला सांगितल्या होत्या.

आजपासून आमची अंघोळ बंद होती. नाश्ता करून सुमारे दहा वाजता आम्ही टेकडी चढायला सुरुवात केली. सर्वांच्या फिटनेसची कसोटी लागत होती. साधारणपणे साडेअकरा-बारा वाजता आम्ही सर्वजण वरती पोहोचलो. वरून न्यालम गावाचे व आजूबाजूच्या परिसराचे सुंदर दर्शन होत होते. आमच्या ग्रुपमधील सात-आठ जण पूर्ण टेकडी चढू शकले नाहीत. काल न्यालम येथील दुकानात घेतलेल्या काठीचा मला खूप उपयोग झाला.

कैलास-मानससरोवर यात्रेला जेव्हा जायचे ठरले तेव्हापासून मी चालण्याचा जोरदार सराव चालू केला होता. ऑफिसचे पाच व विजयनगरचे

Marathi Pratishthan

आठ असे एकूण तेरा मजले रोज कमीतकमी एकदातरी चढायचो व उतरायचो. शनिवार-रविवार अंधेरी पश्चिमेला असलेल्या गिलबर्ड टेकडीवरील मंदिरात जायचा. ऑफिसमधून येताना पार्ले स्टेशनवर उतरून अंधेरीला चालत यायचो. एक दिवस विजयनगर ते सिद्धीविनायक ही पंधरा कि.मी.ची पदयात्रा दरवर्षीप्रमाणे पूर्ण केली. उद्देश एकच की चालण्याचा सराव असावा. रोज सकाळी प्राणायम व कपालभाती चालू होते.

टेकडीवर आमचा सर्वांचा ग्रुप फोटो केसरीने काढला.

दुपारी जेऊन थोडी विश्रांती घेतली. त्यानंतर आम्ही सहा जणांनी पत्त्याचा डाव टाकला. संध्याकाळी फिरायला बाहेर पडलो. रस्त्यावर ठिकठिकाणी चीनने स्वत:चे झेंडे लावले होते. घरांवर अगदी दहा-दहा फूटांवर व्यवस्थित ड्रील करून ते कायमस्वरूपी लावले होते. आम्ही सर्वांनी घरी फोन करून खुशाली कळवली. मी हँडग्लोव्हज विकत घेतले.

धामल,लोकरे व खोसे असल्यामुळे चांगलाच टाईमपास होत होता. ग्रुपमध्ये असलेल्या अहमदाबादच्या अनुपमा शहाला तिच्या आकारामुळे 'याक' असे नाव ठेवले.

**गुरुवार २३-८-२०१२**

सकाळी दहा वाजता आम्ही न्यालम सोडले व सागाला प्रस्थान केले. आजपासून मी डायमॉक्स ही गोळी घ्यायला सुरुवात केली. सागा हे समुद्रसपाटीपासून ४८५० मी. उंचीवर आहे. टप्प्याटप्प्याने आम्ही वर जात होतो. जसजसे आपण समुद्रसपाटीपासून जास्त वर जातो हवेतील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊ लागते. डायमॉक्स मेंदूला ऑक्सिजन पुरवण्यास मदत करते.

वाटेत आम्ही शिशपद्म व गौरीशंकर ही दोन हिमशिखरे पाहिली.

दुपारी एक वाजता आम्ही जेवण केले. आमच्या बरोबर सम्राट ट्रॅव्हल्सचा मोती व त्याचे सहा-सात शेर्पा होते ते सर्व कामे करायचे. जेवण बनवणे, सामान उचलणे वगैरे. आजच्या जेवणाचा मेनू होता - पोळी भाजी, दही, खिचडी व डब्यातले गुलाबजाम. जेवण केले त्या ठिकाणचे नाव होते 'पिका-चू'. साधारण साडेतीन-चारच्या सुमारास आम्ही सागा या गावात पोहोचलो. केसरीने निवडलेले हॉटेल सागा अतिशय पॉश होते. (न्यालमशी कमपेअर करता). मी, फडके व सपर एका रुममध्ये होतो. रूम एसी होती. बेडला हिटर होता. रूमच्या मागच्याच बाजूला चायनिज मिलिटरी कॅम्प होता. त्यांचे फोटो न काढण्याची सक्त ताकीद प्रशांतने आम्हाला दिली होती. संध्याकाळी आम्ही पाचजण सागा बघायला बाहेर पडलो. फडके काकांना थोडा ताप आला होता व त्यांनी डॉक्टरला बोलावले होते. त्यामुळे ते रूमवरच थांबले. सागा छोटेसे गाव होते, पण अतिशय स्वच्छ होते. न्यालमप्रमाणेच या ठिकाणीसुद्धा चायना पोलीस, चायना पोस्ट, चायना मोबाईल ह्यांच्या हिरव्या रंगाच्या चकाचक बिल्डिंग होत्या. शॉपिंग मॉलसारखे एका दुकानात सर्वप्रकारचे सामान मिळत होते. एका हॉटेलच्या बाहेर सायकलीवर टोपलीमध्ये काही खाण्याचे पदार्थ ठेवले होते. बहुतेक डाळीचे पीठ लावलेले साप असावेत. ब्युटीपार्लरच्या दुकानावर ऐश्वर्या रॉयचे फोटो बघून परत एकदा बॉलिवूडच्या वर्चस्वाची जाणीव झाली.

अचानक प्रचंड वारा सुटला व आभाळ भरून आले. अपेक्षेप्रमाणे थोड्याच वेळात पावसाला सुरुवात झाली. आम्ही लगेच हॉटेलवर परत आलो.

फडकेकाकांना लोकल डॉक्टर बघून गेला होता. त्यांना एकमेकांची भाषा अवगत नव्हती म्हणून आमचा चायनिज गाईड दुभाषा म्हणून काम करीत होता. आमचा गाईड हा २५-२६ वर्षांचा एक मुलगा होता. तो दार्जिलिंगला शिकला होता. व त्याला हिंदी, इंग्रजी, नेपाळी, चायनिज व लोकल तिबेटीयन भाषा येत होत्या. त्याच्याबरोबर त्याचा मित्र ट्रेकला आला होता. डॉक्टरांनी फडकेंना त्यांची नेहमीचीच औषधे घ्यायला सांगितली. हवेत ऑक्सिजनचे प्रमाण कमी झाल्याचे जाणवत होते.

रात्री आमच्या ग्रुपमधील श्री. सुधीर कुलकर्णी यांना तब्येत बिघडल्यामुळे सलाईन लावायला लागले.

न्यालम-सागा अंतर २५० कि.मी.

**शुक्रवार २४-८-२०१२**

नेहमीप्रमाणे सकाळी ब्रेकफास्ट व चहाकरिता बेल वाजली. प्रशांतने सागाला ज्यांना अंघोळ करायची असेल त्यांना परवानगी दिली होती. आम्ही तिघांपैकी कोणीच अंघोळ केली नाही. हाय ॲल्टिट्यूड मध्ये प्रवास करताना शक्यतो अंघोळ करू नये असे सांगितले होते. छातीत व फुफ्फुसात पाणी होण्याची शक्यता असते.

सकाळी थंडी चांगलीच जाणवत होती. मी थर्मल वेअर अंगावर चढवला. रात्री झोपण्यापूर्वीसुद्धा डायमॉक्स घ्यायला सुरुवात केली. फडकेकाका व कुलकर्णी यांची तब्येत बरी होती. आमची बस सुटायला थोडा उशीर झाला. आमच्या ग्रुपमधील एका शेर्पाची स्लिपिंग बॅग चोरीला गेली होती. ती बॅग त्याला एव्हरेस्ट एक्सपिडीशनच्या वेळेला एका जर्मन टुरिस्टने भेट म्हणून दिली होती. बरीच खटपट करून मॅनेजरला तक्रार करूनसुद्धा ती बॅग मिळालीच नाही.

सुमारे साडेदहा वाजता आम्ही सागावरून परयांगला जायला निघालो. आम्हाला एकूण २३५ कि.मी.चा प्रवास करायचा होता. तिबेटचा हा प्रदेश म्हणजे एक पठाराचा भाग आहे. खुरटी झुडपे व मोकळे मैदान. एक मोठे झाड कुठे दिसत नव्हते. या प्रदेशाला कोल्ड डेझर्ट असे म्हणतात. रोज आम्ही एवढा प्रवास करत होतो तर रस्ते उत्कृष्ट होते. ड्रायव्हर बस चांगलीच जोरात हाकत होते. ट्रॅफिकचा प्रश्नच नव्हता. क्वचित एखादी गाडी दिसत होती.

दुपारी जुने डुम्बा या ठिकाणी आम्ही जेवायला थांबलो. माझी जेवायची फारशी इच्छा नव्हती तरी थोडेसे खाल्ले. चायना ब्रँडचे लिचीचे ज्यूस प्यायले. केसरी ट्रॅव्हल्सतर्फे आयोजित केलेली ही धार्मिक यात्रा असल्यामुळे जेवणात नॉनव्हेज कधीच नव्हते. आमच्या गाडीचे ड्रायव्हर आमच्याबरोबर न जेवता दुसरीकडे जेवायचे. त्यांना जेवणात याकचे मटण लागते असे मोतीने आम्हाला सांगितले.

वाटेत एका ठिकाणी आमची बस थांबली व आम्हाला निसर्गाचा एक अप्रतिम चमत्कार बघायला मिळाला. आमच्या बाजूला वाळूचे डोंगर होते, जेसलमेरच्या सम Sond Dunesची आठवण करून देत होते. थोड्या पुढील भागात छोटी झुडपे व पाण्याचे सरोवर होते. मागील बाजूला बर्फाच्छादित डोंगर दिसत होते. निसर्गाची ही रूपे एकाच ठिकाणी पाहायला मिळणे हा



Marathe Pratishthan

दुर्मीळ अनुभव होता. रस्त्यातून जाताना अनेक ठिकाणी Solar Photovolatic Cells दिसत होते. चायनाने पॉवर जनरेशनकरिता सौर ऊर्जेचा भरपूर वापर केलेला दिसत होता. अगदी छोट्या झोपडीबाहेरसुद्धा एखादा सोलर पॅनेल दिसत होता.

दुपारी चारच्या सुमारास आम्ही परयांगला पोहोचलो तेथे राहायला आम्हाला मड हाऊस होती. चार भिंती व एक छत म्हणून त्याला घर म्हणायचे. संध्याकाळी आमचा ग्रुप फिरायला बाहेर पडला. आमच्या डफेल बॅगा घेऊन येणारा ट्रक वाळून रूतला होता. तो काढायला वेळ लागल्यामुळे आम्हाला बॅगा मिळायला उशीर झाला. परयांग तसे छोटेसे गाव होते. रस्ते व इमारती बांधण्याचे काम चालू होते. रात्रीच्या जेवणापूर्वी प्रशांतने आमची मीटिंग घेतली. कैलास परिक्रमेसंदर्भात ती मीटिंग होती. आमच्याकरिता घोडे व पोर्टरची त्याला व्यवस्था करायची होती. मी, सपर, खोसे, सूर्याजी यांनी चालत परिक्रमा करायचे ठरवले. फक्त आमची सॅक उचलायला एक पोर्टर घ्यायचे ठरवले.

## शनिवार २५-८-२०१२

कालच्या मीटिंगला केसरीचा असिस्टंट टूर मॅनेजर महेश साळवी तब्येत बिघडल्यामुळे येऊ शकला नव्हता. त्याला खूप ताप आला होता व पुढे जाणे अशक्य होते. पुण्याचे बिरादर यांचीसुद्धा तब्येत बिघडल्याचे समजले. वातावरणात असलेली थंडी व ऑक्सिजनचे कमी होणारे प्रमाण याचा लोकांना त्रास होत होता.

आज मोठ्या उत्साहाने आम्ही परयांग सोडले. सगळ्यांना वेध लागले होते, कधी एकदा मानसरोवराचे दर्शन घेतो. २८०कि.मी. प्रवास करून आम्ही मानससरोवराजवळ पोहोचलो. एन्ट्रंसला एका मोठ्या हॉटेलचे बांधकाम चालू होते. आमची बस मानससरोवराच्याजवळ जात होती. दुपारी सुमारे अडीच वाजता आम्ही मानस येथे पोहोचलो. मानस समुद्रसापटीपासून ४५६० कि.मी. उंचीवर आहे. सरोवराचे पाणी निळेशार होते व अतिशय स्वच्छ होते. १०८ कि.मी. परिघ असलेले ते सरोवर ३०० फूट खोल आहे. सरोवराच्या उत्तरेस कैलास पर्वत होता. हा पर्वत म्हणजे शंकराचे गुरू मांदाता यांचे निवासस्थान. आम्ही सर्वांनी मानससरोवरात पवित्र स्नान केले. काठमांडूला अंघोळ केल्यानंतर चार दिवसांनी आज अंघोळ करीत होतो. पाणी अतिशय थंड होते. मी कैलास पर्वताला अर्घ्य दिले. गुजराती जोडप्याने दिलेला चांदीचा नाग व त्रिशूल सरोवरात अर्पण केला. श्री. कुलकर्णी यांनी चांदीची बिल्वपत्रे अर्पण केली. लोक आपापल्या श्रद्धेप्रमाणे वस्तू अर्पण करीत होते. दोन वर्षांपूर्वी जेव्हा लीनाच्या बँकेतील एक बाई मानसला गेल्या असताना त्यांच्या ग्रुपमधील एकाला सरोवरातून बाहेर आलेल्या चांदीच्या पादुका मिळाल्या होत्या. पुण्याला परत गेल्यावर त्या गृहस्थाने त्याची स्थापना केली व पूजाअर्चा सुरू केली. कैलासच्या परिसरात एकूण १०८ सरोवरे आहेत. (मानससरोवर ब्रह्मदेवाच्या मानसिक सार्मथ्यातून निर्माण झाले आहे.) मात्र ती सर्व खाऱ्या पाण्याची असून फक्त मानस गोड्या पाण्याचे आहे. मानसच्या काठीच आम्हाला थोडे पक्षी दिसले. कधीकधी तिथे राजहंस दिसतात असे म्हणतात. मानसच्या बाजूलाच रावणाचे 'राक्षसताल' नावाचे सरोवर आहे. मानसच्या किनाऱ्यावरची पवित्र वाळू व दगड मी जमा केले. केसरीने प्रत्येकाला दोन लिटरच्या कॅनमध्ये मानससरोवराचे पाणी भरून दिले. दुपारचे जेवण आम्ही सरोवराकाठी केले. जेवण करून आम्ही मडहाऊसवर आलो. परत चार भिंती व एक छत परयांगसारखेच. मड हाऊसपासून दूर असलेले अस्वच्छ चरीचे संडास.

थोडी विश्रांती घेऊन आम्ही सर्वजण सरोवराकाठी पूजा करायला निघालो. सर्व पस्तीसजण पूजा करीत होते. केसरीने प्रत्येकाला पूजेचे साहित्य दिले होते. श्री. सपर लघुरुद्राची आवर्तने करीत होते. मी घरून शंकराची पिंड घेऊन गेलो होतो. त्यावर मानसच्या पाण्याचा अखंड अभिषेक करीत होतो. लघुरुद्र म्हणून झाल्यावर आम्ही सर्वांनी आरती केली व प्रसाद वाटला. सर्वांचे मन प्रसन्न झाले. रात्रीचे जेवण झाल्यावर दोनचा गजर लावून झोपलो. त्याप्रहरी आकाशातले तारे खाली येतात असा भास होतो. देव व गंधर्व मानसरोवरात स्नान करतात अशी आख्यायिका आहे. मी, सपर, धमाल व बुलढाणा ग्रुप रात्री २ ते ४ मानसकाठी बसून होतो, पण ते दुर्मीळ दृश्य पाहणे आमच्या नशिबात नव्हते. ते दृश्य क्वचितच पाहायला मिळते असे प्रशांत सावे म्हणाला.

## रविवार २६-८-२०१२

कॅलेंडर नाही, टीव्ही, रेडिओ नाही त्यामुळे रविवार काय नी वीकएंड काय आम्हाला काही फरक पडत नव्हता.

सकाळी मी, सपर, खोसे व लोकरे मड हाऊसच्या बाजूलाच असलेली एक टेकडी चढायला गेलो. टेकडीव बौद्ध लोकांचे एक देऊळ होते. पद्मसमभाव असे त्याचे नाव होते. आतमध्ये जाऊन प्रथेप्रमाणे आम्ही तुपाचा दिवा लावला व कैलास परिक्रमा व्यवस्थित पूर्ण व्हावी यासाठी प्रार्थना केली. टेकडीवरून मानसरोवर व राक्षसताल दोन्ही व्यवस्थित दिसत होते. सूर्याजी काल संध्याकाळीच टेकडीवर गेला होता व सनसेट आणि कैलास दर्शन करून आला होता.

दुपारचे जेवण झाल्यावर आम्ही जड अंत:करण मानसरोवराचा निरोप घेतला व कैलासच्या पायथ्याशी असलेल्या दारचेन या गावी निघालो. दारचेन समुद्रसपाटीपासून ४५६० मी. उंचीवर असून मानसरोवरापासून ५० कि.मी. अंतरावर आहे. या ठिकाणीसुद्धा आम्हाला दिलेल्या रुम्स यथातथाच होत्या. आमच्या ग्रुपमधील बरेचजण बाजूच्या हॉटेलमध्ये शिफ्ट झाले. मी, सपर, फडके, पाठक जोडपे, अनुपमा अशी मोजकीच मंडळी केसरीने व्यवस्था केलेल्या रुमवरच राहिलो. संध्याकाळी कैलसाचे अप्रतिम दर्शन झाले.

सुधीर कुलकर्णींची तब्येत परत बिघडली होती. पुण्याचे बिरादर यांची तब्येतसुद्धा खूपच बिघडली. दोघांना तातडीने काठमांडूला हलवून हॉस्पिटलला हलविणे आवश्यक होते. प्रशांतने एक शेर्पा व एक व्हॅन बरोबर श्री. व सौ. कुलकर्णी आणि श्री. व सौ. बिरादर यांना काठमांडूला रवाना केले. केसरीचा असिस्टंट टुर मॅनेजर अगोदरच काठमांडूला पोहोचला होता व तिथे गेल्यावर त्याची तब्येत सुधारली होती. श्री. बिरादर हे मूळचे कर्नाटकचे व त्यांच्या तरुणपणी ते लाँग जंपचे रेकॉर्ड होल्डर होते. पुण्यालासुद्धा ते दहा-पंधरा कि.मी. सहज चालायचे. महेश साळवीसुद्धा मॅरेथॉन धावपटू

Marathe Pratishthan

असून दिल्लीहून मुंबईला धावत आला होता. पण प्रशांतने सांगितल्याप्रमाणे कैलास मानससरोवराच्या प्रदेशात गेल्यावर काही सांग्रवताता येत नाही. नशिबात असेल तरच ही यात्रा घडते. प्रशांत सावे नऊ वेळा कैलासला आलाह होता. हाडाचा गिर्यारोहक होता. त्याच्याहून मोठा अवलिया म्हणजे सम्राट ट्रॅव्हल्सचा मोती. तो या अगोदर ४८ वेळा परिक्रमा करून आला होता व आमच्याबरोबर ४९व्या वेळेला येणार होत. देश-विदेशातल गिर्यारोहकांना गिरीभ्रमण करताना मदत करणे हा त्याचा व्यवसाय. त्याची स्वत:ची एक रजिस्टर्ड कंपनी आहे. हिमालयातील मुख्यत्वे करून एव्हरेस्ट मोहिमेसाठी येणाऱ्या गिर्यारोहकांना सेवा पुरवतो.

**सोमवार २७-८-२०१२**

ज्यासाठी केला होता अट्टाहास तो दिवस अखेर उजाडला. आज आम्ही कैलास परिक्रमेला सुरुवात करणार होतो. योगायोगाने आज सोमवारसुद्धा होता. हॉटेलवर शिफ्ट झालेली सर्व मंडळी नाश्ता करायला आमच्या येथे आली. श्री. लोकरे परिक्रमेला येणार नसल्याचे कळले. त्यांनी दारचेन येथेच मुक्काम करण्याचे ठरवले. प्रत्येकाने एक सॅक व त्यात आवश्यक असे सामान म्हणजे औषधे पाण्याची बाटली, ड्राय फ्रूटस व गरम कपडे घेतले होते.

दारचेनवरून निघून बसने आम्ही ८ कि.मी प्रवास करून तारबोचे या ठिकाणी आलो. परिक्रमा सुरू करण्यापूर्वी आम्ही समद्वार या ठिकाणाला भेट दिली. सर्वांनी तीन प्रदक्षिणा घातल्या व परिक्रमा सुखरूप पार पडण्यासाठी प्रार्थना केली. बरेच लोक त्या ठिकाणी कोणत्यातरी वस्तूचा त्याग करतात. मी, सपर, डॉ.मोटे, लोकरे, सूर्याजी व बुलढाण्याचा शशांक पंधाडे आम्ही सहा जणांनी चालत जाण्याचे ठरवले. इतर सर्वजण घोड्यावरून जाणर होते. घोड्यावरील व चालत जाणारे आम्ही सर्वांनी आमची सॅक उचलायला पोर्टर घेतला होता. सर्व पोर्टर चेहऱ्याने सारखेच दिसत होते. प्रत्येकाने चिठ्ठी उचलून आपला पोर्टर व घोडेवाला निवडला. पोर्टर व घोडेवाला निवडल्यावर प्रत्येकाने त्याच्याबरोबर आपला एक फोटो काढला, कारण एकच पुढेच तीन दिवस तोच पोर्टर आमच्याबरोबर असणार होता. त्याला ओळखणे सोपे जावे म्हणून हा सर्व सोपस्कार माझ्या पोर्टरचे नाव होते 'शिरीन'. २२-२३ वर्षांचा मुलगा होता. पोर्टर म्हणून काही मुली व बायकासुद्धा होत्या. साधारणपणे अकरा वाजता आम्ही परिक्रमेला सुरुवात केली. चालणारे व घोड्यावरून जाणारे अशा सर्वांना रवाना केल्यावर प्रशांत मोती व इतर शेर्पा निघाले. आम्हाला प्रत्येकाला पॅक केलेले लंच बॉक्स दिले होते. तीन दिवस लागणारे इतर सर्व सामाना म्हणजे रात्रीच्या जेवणाचा शिधा, पाणी वगैरे या कवर लादून शेर्पा चालले होते. आमच्या सर्वांच्या ड्युफेल बॅगा दारचेनला ठेवल्या होत्या.

परिक्रमा करताना कैलास पर्वताचे पश्चिमेकडे अप्रतिम दर्शन होत होते. आमच्या उजवीकडे कैलास होता व डावीकडे 'ल्हा चु' नावाची नदी वाहत होती. नदीचे पात्र खूप मोठे होते. केसरीच्या ग्रुपप्रमाणे काही तिबेटी व चीनी लोकसुद्धा परिक्रमा करीत होते. हिंदू धर्मात जसे कैलास हे शंकराचे निवासस्थान मानले जाते. त्याचप्रमाणे तिबेटी व जैन लोकसुद्धा त्याला देवासमान मानतात इतर पर्वतांवर, डोंगरांवर जसे लोक ट्रेक किंग करतात तसे कैलासवर देवाचे वास्तव्य असल्यामुळे त्याला कोणी पाय लावत नाही तर त्याला प्रदाभक्षिणा घालतात. परिक्रमा करतात.

(कैलास पर्वताच्या नैसर्गिक स्थानामुळे व रचनेमुळे तो एखाद्या शिवलिंगासारखा दिसतो.)

स्टॅमिना राहावा दम कमी लागला म्हणून प्रशांतने सांगितलेल्या सर्व सूचन आम्ही पाळत होतो. आवश्यक तेवढेच बोलणे इतर रोजचे व्यायाम न करणे वगैरे. घोड्यावरच्या लोकांनी आम्हाला क्रॉस केले. दुपारी एकच्या सुमारास आम्ही जेवणासाठी थांबलो. सर्वांनी आपले लंच बॉक्स उघडून जेवण केले व थोडी विश्रांती घेऊन आम्ही परत चालायला सुरुवात केली. गळ्यात थर्मासमध्ये गरम पाणी भरून घेतले होते. ते मधे घोट घोट घेत होतो. रस्ता चढ-उताराचा होता. मुंबईत चालणे व इकडे चालणे यात जमीन-अस्मानाचा फरक होता. सर्वांत शेवटी निघूनसुद्धा प्रशांत व मोतीने आम्हाला केव्हाच मागे टाकले. सुमारे चार वाजता दहा कि.मी. चालून आम्ही 'दिरा पुक' या ठिकाणी पोहोचलो. आमच्या राहण्याच्या ठिकाणापासून समोरच कैलासपर्वत होता. त्याचे सर्व दर्शन घेत होते. संध्याकाळी कैलाससमोर बसून आम्ही 'रत्नै: कल्पितास हिमजलै:' ही श्रीशिवमानसपूजा म्हटली. इयत्ता आठवीमध्ये असताना संस्कृतच्या नाडकर्णीबाईंनी ती मला शिकवली होती. नंतर आम्ही रामरक्षासुद्धा म्हटली. सूर्याजी कोठेतरी गायब झाला होता. रात्री नऊ-साडेनऊ वाजता तो आला. मोतीला बरोबर घेऊन तो कैलासच्या पायथ्यापर्यंत जाऊन आला. तिथे त्याने बरोबर आणलेल्या तूपाच्या सव्वा लाख वाती पेटवल्या. एखाद्या माणसाची देवावर केवढी अपार श्रद्धा असू शकते त्याची ही प्रचिती.

संध्याकाळी कैलाससमोर बसलेले असताना कोणाला त्याच्यावर शंकर-पार्वतीचे चित्र दिसत होते. कोणाला गणपती तर कोणाला त्रिशूल व नंदी.

**मंगळवार २८-८-२०१२**

सकाळी सहा वाजता नेहमीप्रमाणे शेर्पांची हाक आली, दात घासायला गरम पाणी आणले आहे म्हणून नाश्ता व चहा घेऊन आम्हाला निघायला नऊ वाजले. आजची परिक्रमा सर्वांत खडतर होती. एकूण २५ कि.मी. आम्हाला पार करायचे होते. त्यातले पहिले आम्हाला पार करायचे होते. त्यातले पहिले नऊ कि.मी. पूर्णपणे चढ होता. मी व श्री. खोसे यांनी घोडा घेतला. साधारणपणे अकरा वाजता मी डोलमाला पास या परिक्रमेतील सर्वांत उंच ठिकाणी पोहोचलो. 'डोलमाल पास' हे समुद्रसपाटीपासून ५६५० मीटर म्हणजे जवळजवळ १९००० फूट उंचीवर आहे. बर्फवृष्टी चालू होती व थंडी चांगलीच जाणवत होती. माझा पोर्टर शिरिन चालत अगोदरच वरती पोहोचला होता. डोलमाला पासवर थोडी फोटोग्राफी केल्यावर सहा कि.मी. आम्हाला पूर्ण उतार होता. वाट अतिशय चिंचोळी होती.

(डोलमाला पास वरून खाली उतरताना गौरकुंड लागले. त्याल शिवपुराणात 'करुणातीर्थ' म्हणतात) व रस्त्यात दगडधोंडे खूप होते. डोलमाला पासवरती मी घोडा सोडला. पूर्ण सहा कि.मी. सर्वांना चालतच उतरायला लागले. घोड्यांना माणसांना पाठीवर बसवून तो, उतार उतरणे कठीण होते. डोलमाला पासवर आमच्या ग्रुपमधील काही लोकांनी बरोबर आणलेल्या ऑक्सिजन सिलेंडरचा वापर केला. सहा कि.मी.

Marathe Pratishthan

उतरल्यावर सुमारे पाऊण वाजता आम्ही लंच घेतला. थोडी विश्रांती घेऊन आम्ही परत चालायला सुरुवात केली. रस्ता मोठा होता, पण पाऊस पडल्यामुळे खूप चिखल झाला होता. वाटेत एक-दोन ट्रक सामानाची ने-आण करताना दिसले. त्यावरून काही वर्षांनी येथे गाडीतून परिक्रमा चालू होईल असे वाटते.

दुपारी तीन-साडेतीनच्या सुमारास आम्ही दहा कि.मी. चालून झुझुलपुक येथे पोहोचलो. समुद्रसपाटीपासून ४७७० कि.मी. उंच आमचा मुक्काम मड हाऊसमध्ये होता.

### बुधवार २९-८-२०१२

आज परिक्रमेचा शेवटचा दिवस. श्री. सपर यांचा पोर्टर बदलला होता. साधारण सकाळी दह वाजता आम्ही चालायला सुरुवात केली. मी, धमाल व खोसे एकत्र चालत होतो. गेल्या दोन दिवसात आम्ही ३५ कि.मी. चाललो. आणि आज शेवटचे सहा कि.मी. रस्ता परत चढ-उताराचा होता. मध्ये छोटे डोंगर लागत होते. दोन दिवस परिक्रमा करताना आम्हाला कैलास दर्शन झाले होते. (गौरीकुंडाच्या ठिकाणी गणपतीला हत्तीचे मस्तक प्राप्त झाले होते.) परंतु आज इतर डोंगरमध्ये असल्यामुळे दर्शन शक्य नव्हते. प्रशांत व डॉ. माटे यांनी आम्हाला नेहमीप्रमाणे मागून येऊन क्रॉस केले. घोडेवाली मंडळी बहुधा उशीरा निघाली हाती. दुपारी बाराच्या सुमारास माझी परिक्रमा पूर्ण झाली. प्रशांत व डॉ. माटे आमचे स्वागत करायला उभे होते. त्या दोघांनंतर खोसे व त्यानंतर मी आमच्या ग्रुपमधील परिक्रमा पूर्ण करणारा चौथा मेंबर होतो. घोडेवाल्या मंडळींना दोन कि.मी. अगोदरच उतरवल्यामुळे तेवढे अंतर ती चालत आली. सगळ्यांच्या चेहऱ्यावरती परिक्रमा निर्विघ्नपणे पार पडल्याचा आनंद व समाधान दिसत होते. आयुष्यातील एक अवघड उद्दिष्ट्य पार पडले होते. देवाची-शंकराची म्हणतो इच्छा होती म्हणूनच ही अवघड यात्रा पार पडली. बरेचसे श्रेय माझा पोर्टर शिरीनला द्यायला पाहिजे. पूर्ण परिक्रमा तो माझ्याबरोबर होता. मी त्याला शंभर युआन भेट दिले.

बसने अर्ध्या तासात आम्ही दारचेन येथे आलो. लोकरेंनी आमचे स्वागत केले. सर्वांनी लगेच आपल्या घरी फोन करून परिक्रमा निर्विघ्नपणे पार पडल्याचे कळले. दुपारचे जेवण घेऊन आम्ही लगेच परयांगला निघालो. परयांग दारचेनपासून २७७ कि.मी. आहे. पूर्वीच लिहिल्याप्रमाणे चीनने तिबेटमधील रस्ते अतिशय उत्कृष्ट बनविले आहेत असे म्हणतात. युद्ध नाही म्हणता येणार, घुसखोरी करायची झाल्यास बिजिंगपासून त्यांचे रणगाडे लवकरात लवकर नेपाळ बॉर्डरजवळ आणण्याकरिता रस्ते असे बनवले आहेत. चीनने तिबेटमध्ये लोहमार्गाचे कामसुद्धा जोरात सुरू केले आहे. तिबेटची राजधानी ल्हासापर्यंत रेल्वे चालू आहे.

साधारपणे संध्याकाळी पाचवाजता आम्ही परय्वा येथे आलो. तेथे जवळजवळ पंधरा-वीस लँड क्रूझर उभ्या होत्या. साऊथ इंडियन लोकांचा एक मोठा ग्रुप तिथे आला होता. ती गर्दी बघून आमच्या ग्रुपमधील काही लोकांनी परयांगला न राहता पुढे जाऊन सागाला राहू या असे प्रशांतला सांगितले. पूर्वी राहिलेले परयांगचे मड हाऊस आता या लोकांना नकोसे झाले होते. मानसरोवरातील स्नान व कैलास परिक्रमा पूर्ण झाली होत ना म्हणतात ना गरज सरो नि वैद्य मरो. सागाला पोहोचायला खूप रात्र झाली असती. हॉटेल बुक नव्हते आणि मुख्य म्हणजे केसरी ट्रॅव्हल्सच्या इटिनिररी मध्ये ते नव्हते. संध्याकाळी आम्हाला आकाशात अतिशय दुर्मीळ अशी दोन इंद्रधनुष्ये दिसली. एकाचेवळी केसरीने दिलेले खाण्याचे सामान आम्ही तेथील मुलांना वाटले. रात्री पत्त्याचा डाव टाकला.

### गुरुवार ३०-८-२०१२

सकाळी सात वाजता उठून नाश्ता करून आम्ही परयांग सोडले. आम्ही न्यालमकडे निघालो होतो. वाटेत सागा लागले. प्रशांतने गाडीत मोबाईलवर गाणी लावली होती. सुमारे ४८०कि.मी. प्रवास करून आम्ही परत न्यालम येथील हॉटेल शीशपद्म येथे आलो परत त्या ठिकाणी आल्यामुळे ही सर्व ठिकाणे मला जवळची व आपली वाटू लागली. आमच्या ड्युफेल बॅगा घेऊन येणारा ट्रक काहीतरी बिघाड झाल्यामुळे फार उशिरा आला, त्यामुळे आम्हाला जेवायलासुद्धा उशीर झाला.

### शुक्रवार ३१-८-२०१२

सकाळी नऊ वाजता आम्ही न्यालम सोडले व काठमांडूकडे निघालो. आमची यात्रा १९ ऑगस्टलास सुरू झाली होती. आमच्या मागून २३ ऑगस्टला केसरीचा सुमारे ५५जणांचा आणखी एक ग्रुप कैलासला निघाला होता. मेरीगोल्डच्या डायरेक्टर संगीता पाटील स्वत: प्रवास करीत होत्या. या ग्रुपला एवढी गर्दी असण्याचे कारण म्हणजे हा ग्रुप बरोबर पौर्णिमेच्या दिवशी मानसरोवराला पोहोचणार होता. आज ३१ ऑगस्टला त्यांची परिक्रमा सुरू होणार होती. परंतु घोडेच नसल्यामुळे त्यांना जादा दिवस दारचेनला मुक्काम करायला लागला.

दुपारी आम्ही झाग्मू गाव पार करून फ्रेंडशिप ब्रिजवर पोहोचलो. बाजूने भोटे-कोसी नदी वाहत होती. चालत बॉर्डर क्रॉस केली. हिमालयन रेस्टॉरंटमध्ये जेवण केले. परत घड्याळे मागे केली. हॉटेलमधील एजंटला युआन परत देऊन रुपये घेतले.

नेपाळमध्ये भारताच्या ५०० व १०००च्या नोटा चालत नाहीत. सगळ्या ५०-१००च्या वगैरे वापराव्या लागतात. काठमांडू जसे जवळ येऊ लागले तसे प्रचंड गरम व्हायला लागले. सगळ्यांनी जॅकेट, स्वेटर, कानटोपी काढून टाकले. गेले अकरा दिवस अंघोळ करून फ्रेश होऊन डिनरला भेटलो. सगळे यात्रा परिपूर्ण झाल्यामुळे खूप आनंदात होते. महेश साळवी, बिरादर व कुलकर्णी भेटले. कुलकर्णी काठमांडूला आल्यावर एकदम टुणटुणीत झाले होते. आम्हाला यायला वेळ होता म्हणून ते चितवनची ट्रीप करून आले. बिरादर थोडे नरम होते.

बऱ्याच दिवसांनी आम्ही चांगल्या बेडवर मस्तपैकी एसी लावून गाढ झोपलो.

### शनिवार १-९-२०१२

परत पहाटे उठून आम्ही हिमशिखरे पाहायला निघालो. गाडीतले गाईडचे नाव काका असे होते. तो म्हणाला आतापर्यंत ज्या लोकांना तो घेऊन गेला होता. त्यांना नेहमीच दर्शन झाले होते. कोणाला कधीच निराश व्हायला लागले नव्हते. एअरपोर्टवर पोहोचल्यावर आम्ही बोर्डिंग पास घेतला. सपर रुमवरच होते. थोडे थकलेले वाटत होते. लोकरे त्यांना 'डॅडी' म्हणायचे.

अखेर आजसुद्धा हवामान खराब असल्यामुळे आम्हाला हिमशिखरे काही पाहता आली नाहीत. काका काहीतरी बाता मारत होता. सगळ्यांना



Marathe Pratishthan

बहुधा तो हेच सांगत असावा. आम्ही हॉटेलवर नाश्ता करायला आला. अर्ध्या लोकांनी काठमांडू सिटी टूर करायचे ठरवले. उरलेले लोक रुमवरच आराम करीत राहिले.

प्रथम आम्ही काठमांडू शहरापासून आठ कि.मी. अंतरावर असलेल्या 'बुढानीलकंठ' ह्या विष्णूच्या देवळात आलो. पूर्व दिशेकडे डोके करून शेषनागावर जवळपास एक मीटर लांब दगडावर झोपलेली विष्णूची मूर्ती आहे. नंतर भक्तपूर पॅलेस पाहिला. हा नुसताच पॅलेस नसून ६.८८चौ.कि.मी. क्षेत्रात व्यापलेले एक नगर आहे. बाराव्या ते पंधराव्या शतकापर्यंत ती नेपाळची मुख्य राजधानी होती. व परिसरात दरबार स्क्वेअर, तौमाधी स्क्वेअर, सिद्धी लक्ष्मी स्टोन टेंपल, यक्षेश्वर टेंपल, दत्तमंदीर अशी ठिकाणे पाहिली.

भक्तपूर पॅलेसपासून चार कि.मी. लांब डोंगरावर असलेले चांगुनारायण मंदीर बघितले. हे प्राचीन मंदीर राजा हरिदत्त वर्मा याने इ.स. ३२३ मध्ये बांधले. राजा मानदेव याने त्यामध्ये अनेक सुधारणा केल्या. नंतर लंच करायला आम्ही परत हॉटेलवर आलो.

लंचनंतर सगळे 'कुमारी मंदीर' बघायला गेलो. मी हॉटेलवरच आराम केला. संध्याकाळी मी व सपर थामेल मार्केटमध्ये गेली. थोडा फेरफटका मारला व संध्याकाळी हॉटेलवर परतलो.

केसरीने सर्वांसाठी गेट- टुगेदर आयोजित केले होते. मोती व त्याच्या शेर्पांचे बक्षीस देऊन आम्ही सर्वांनी आभार मानले. केसरी व सम्राट ट्रॅव्हल्सनी कैलास-मानससरोवर यात्रेत सहभागी झाल्याबद्दल सर्वांना प्रमाणपत्र दिले. शेवटच्या दिवशी मला समजले श्री. फडके हे प्रणवेश भावे याचे सख्खे मामा.

## रविवार २-९-२०१२

आज आमच्या यात्रेचा शेवटचा दिवस सर्वांना घरचे वेध लागले होते. काठमांडू विमानतळावर आम्ही लवकर पोहोचलो. सर्वजण एकमेकांचा निरोप घेत होते. जेट एअरवेजचे ९डब्ल्यू-२६३ विमान वेळेवर साडेनऊ वाजता सुटले. अकरा वाजता दिल्लीला पोहोचलो. दुपारी दोन वाजता जेट एअरवेजच्या ९डब्ल्यू-३५२ विमानाने सुमारे चार वाजता आम्ही मुंबईला पोहोचलो.

मागे वळून बघता मनात विचार येतो. ही सहल नव्हे यात्रा इतर सहलीपेक्षा खूप वेगळी होती. जाण्यापूर्वीची तयारीच बघा. इतर सहलीला न लागणारे असे अनेक सामान अनेक वस्तू बरोबर घेतल्या होत्या डायमॉक्स गोळी, कोल्ड क्रीम, सनस्क्रीम लोशन ऑक्सिजनचा पुरवठा कमी झाल्यास वापरलेला भीम कापूर परिक्रमा करताना ताकद यावी म्हणून घेतलेले ड्रायफ्रूटस,चॉकलेटस मध्येच गरम पाणी पिण्यासाठी थर्मास, पावसात डफेल बॅग भिजू नये म्हणून आतून लावायला प्लास्टिक वगैरे. हिंदूधर्मात कैलासमानससरोवरची यात्रा ही तिच्या खडतरपणामुळे आयुष्यातील शेवटची यात्रा मानली जाते. मी या यात्रेकडे धार्मिक भावनेप्रमाणेच एक ट्रेकिंग व ॲडव्हेंचर्स अनुभव म्हणून गेलो होतो. वय वर्ष ६५च्या वरच्या लोकांना यात्रेत परवानगी नाही. मला असे वाटते तरुणपणीच ही यात्रा केलेली चांगली चांगल्याप्रकारे एन्जॉय करता येते.

अशातऱ्हेने माझ्या आयुष्यातील कैलास मानससरोवर ही अविस्मरण, अतुलनीय, अवघड व क्वचितच घडणारी यात्रा पार पडली.

**- श्री. आनंद मराठे**
अंधेरी

### मानसन्मान

कु. अदिती प्रमोद चक्रदेव यंदाच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा मार्च २०१३ मध्ये ८९.०९% मिळवून उत्तीर्ण झाली. विज्ञान विषयात तिला १०० पैकी ९९ मार्क मिळाले व त्यानिमित्त शाळेतही हिचा गौरव करण्यात आला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कु. अदितीचे हार्दिक अभिनंदन. पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी यशाच्या शुभेच्छा! मराठे प्रतिष्ठानचे गुणवत्ता पारितोषिक अदितीने मिळवले आहे.

### मानसन्मान

कु. तनया प्रशांत मराठे ही माध्यमिक शालांत दहावीच्या परीक्षेत ८६% गुण मिळवून उत्तीर्ण झाली. मराठे प्रतिष्ठानतर्फे तिला गुणवत्ता पारितोषिक मिळाले आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कु. तनयाचे हार्दिक अभिनंदन. पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी यशाच्या शुभेच्छा!

### मानसन्मान

चि. आदित्य अजय मराठे (अविनाश रामचंद्र मराठे) बार्शी (पृ. ३६५) ह्यांचा नातू ह्याने ॲबॅकस गणिताच्या सेमास ॲकॅडमी चेन्नई ह्यांनी घेतलेल्या अखिल भारतीय स्पर्धेत १५०० मुलांमध्ये पहिला क्रमांक पटकावला व शील्ड मिळवले. त्याने चार मिनिटात सर्वांत प्रथम ५० गणिते अचूक सोडवली. मराठे प्रतिष्ठानद्वारा चि. आदित्यचे हार्दिक अभिनंदन. पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी यशाच्या शुभेच्छा!



Marathe Pratishthan

# RAMAKANT - PERSONAL LIFE SKETCH 7

- श्री. रमाकांत माधव विद्वांस (पृ.६२३)

## JOINT VENTURE WITH THE HUNGARIANS

In 1977, while I was 2at the Head Office of the HCC at Mumbai, a grand opportunity came my way. HCC decided to bid for part Calcutta Metro from Netaji Subhash Statue opposite R. G. Kar Medical College to Chitpur Railway Yard which was to be constructed using Shields. Since, this was the first time shields were to be used for tunnelling in India. HCC decided to form a technical joint venture with an experienced foreign organization.

First Underground Metro in the world was the London Metro. Budapest Metro was second in the world. The strata in which the Calcutta Metro Shield Tunnels are located comprised of silty clay and clayey silt and contained dissolved explosive and obnoxious gases like methane and carbon monoxide. Since major length of the Budapest Metro was also located in similar strata and construction was being carried out with the help of Compressed Air Shields, HCC decided to form a technical collaboration with a group of Hungarian organizations.

Hungary is a landlocked country in Eastern Europe with a population of about one crore. The country occupies an area of about 93,000 sq.km., which is almost one third that of Maharashtra. In 1977 and further till 1989 Hungary was known as Hungarian People's Republic and was a communist country under the guidance of the Soviet Union. The country was so highly industrialized that Hungarian Machinery Manufacturers were giving a tough competition to Westinghouse of America, Hunslet of England and Ansaldo of Italy etc. Hungary was then considered as Central Europe's most successful and nation.

Hungary is a landlocked country in Eastern Europe with an population of about one crore. The country occupies an area of about 93,000 sq.km. which is almost one third that of Maharashtra. Hungary has over 99% literacy rate and is technologically highly developed. Till 1989 Hungary was known as Hungarian People's Republic and was a communist country under the guidance of the Soviet Union. At one time, the country was so highly industrialized that Hungarian Machinery Manufacturers were giving a tough competition to Westinghouse of America, , Hunslet of England and Ansaldo of Italy etc. At one time Hungary had produced the best brains and scientists; however, with communism creeping in they migrated out of Hungary leading to a brain drain. During the communist regime, because of trade unionism, skilled workers started earning more than supervisors and qualified officers. A stage came when the youngsters aspired to become skilled workers rather than pursuing higher studies. The picture changed in the eighties when the Soviet Union guided rule came to an end. The Soviet Union got into deep economic troubles and crashed and the central European nations including Hungary suddenly found their freedom. Thereafter, many industrial giants entered Hungary and Industry flourished. Hungary was considered as Central Europe's most successful and promising countries until the financial crisis hit the country in 2008. Since then, the economy has been stagnating due to heavy public debt and social tensions have been growing.

Hungarians are hard working people. They are great savers. They always prefer to save the money they need and then buy what they need than to acquire any debt with a bank. However, times are changing and slowly Hungarians are becoming big spenders. The Hungarians are known to respect women, elders as well as ancestors. Hungarian people believe in strong familial values. Family is the center of the Hungarian social structure, providing both financial and emotional support for its members. In Hungary, generations of extended family support each other and live together, with the family comprising biological parents, grandparents, and usually two children. Hungarians are very intelligent people who have contributed greatly to the world in many areas such as science, arts, music and technology. Zoltan Kodály, Béla Bartok, Franz Liszt, and Joseph Pulitzer are just a few names of the long list of famous Hungarians.

Hungarians eat a lot of hot spice food. Goulash [Gulyas ] is a soup or meat and vegetable stew. It is very similar in taste to potato curry we make in India minus the meat. Hungarians use a lot of Paprika which is similar to Capsicum. Paprika vary in taste from very mild to very hot. Hungary is famous for wines. A thick red wine known as Egri Bikaver [Bull's Blood ] and a topaz coloured wine known as Tokaji Aszu are famous the world over. Hungarian is also famous for embroidery. Specialty of Hungarian embroidery is that the design appears identical on both sides of the cloth.

HCC had formulated a team of engineers for carrying out negotiations with the Hungarians and I was a member of the team. My responsibility was not only to participate in the negotiations but also to prepare HCC's bid for the



Marathe Pratishthan

tender. I therefore studied the tender documents and the drawings in great details and also poured over the available literature and case studies. I thus prepared myself very well for the discussions. My two colleagues were much senior to me but unfortunately, they were not well prepared. This gave me an upper hand in the negotiations.

Since, this was the first time shields were to be used for tunnelling in India and none of us had even seen a shield and did not have enough knowledge on the subject for carrying out negotiations with our Hungarian counterparts. Therefore, before visiting Hungary, we visited Rome, Milan and Paris to see tunnels where shields were in use and had discussions with their engineers to understand the problems faced by them. We were therefore fairly well equipped for discussions with our Hungarian counterparts.

Before we left for Eu12rope, our boss had advised us that we should make it a point to stay in four or five star hotels and be nicely dressed as we will not only be representing HCC but also India. We therefore booked ourselves in Intercontinental, Holiday inn or similar hotels. Therefore, whatever places we visited, our counterparts used to look at with respect and provide us with local transport and entertained us at dinners etc

In 1977, Hungary was still a communist country under the guidance of the Soviet Union. Technology and manufacturing organizations were not allowed to directly interact with foreign organizations and had to go through a Hungarian foreign trading organization. For Calcutta Metro Shield Tunnelling, we needed technical know-how in respect of construction of tunnel with the help of a shield, designs and prefabrication of concrete segments for lining the tunnel lining. We therefore had to associate with three different Hungarian organizations - KEV Metro for Metro Construction, UVATERV for Designs and BVM for prefabrication of concrete segments for tunnel lining through NIKEX Hungarian Trading Company.

Because of soviet influence, till the technical joint venture agreement was concluded, the Hungarians were very much guarded and secretive. In those days very few Hungarians knew English language.

First round of our meetings with the Hungarian team was scheduled from Monday morning to Friday evening. Our plan was to visit the shields and spend enough time studying the operations on Monday, have detailed discussions on Tuesday, visit the shields for further observations on Wednesday, carryout further discussions and exchange ideas on the technical joint venture arrangements on Thursday and Friday and then leave Hungary on a three week tour of Europe to study a few more Metros and some other interesting projects, before returning to Hungary for second round of discussions.

However, on Monday, leader of the Hungarian Team told us that their technology and documentation was secret and that they would not like to reveal to us details of their technology unless HCC makes up its mind and decides to go with the Hungarians. They were apprehensive because as per our programme, we were visiting many other projects in Europe, some involving their competitors and they had formed an impression that HCC had not made up its mind to go with the Hungarians. This gave us a shock as at Mumbai HCC had already signed an MOU with NIKEX expressing agreement to go together. Much against the wish of my colleagues, I raised A strong objection to the attitude of the Hungarian Team and told them that we were visiting many other shield tunnelling projects involving their even their competitors in order to learn more about the available technologies and that HCC was not an organization that would go back on the MOU already signed even if we came across better technologies during our visit to projects in Europe. I further told them that if the Hungarians had any apprehensions of going with HCC, we would definitely select another JV Partner from Europe, before going back to India. With my strong protest, the Hungarians formed an impression that I was the leader of the team and treated me so. This settled the doubts and we could visit the shields that afternoon. Further discussions and negotiations were also quite smooth and friendly and they even handed over to us documentation on their technology for our study. We could leave for Europe by Saturday as planned

We thereafter visited Frankfurt, London and New Castle to see Metros under construction and Geneva, Stockholm, Malmo and Copenhagen to study some highly mechanized tunnel construction and Oslo and Bergen to study some off-shore Oil Storaage and Drilling Rigs.

We returned to Hungary on a Monday, three weeks later. During this round of discussions, we had to conclude the negotiations and prepare a draft preliminary agreement for approval of HCC's General Manager, who was to visit Budapest before the weekend. My techno-legal background helped me a lot in finalizing the draft technical collaboration agreement with my counterpart who happened to be a Hungarian Lawyer.

On the Thursday, after we finalized the draft of the preliminary agreement, BVM – our associates for prefabrication of concrete segments for tunnel lining invited us to visit its corporate office, followed by lunch. The meeting started with exchange of pleasantries. MD of BVM proposed a toast and I acknowledged. Thereafter, the MD requested me to write my impressions in a visitor's book. After I signed the book, he told me that this was BVM's

Marathe Pratishthan

first collaboration with India and I had the honour of signing in the VIP Visitors Book which included signatures of some heads of European nations.

On Thursday evening our General Manager arrived and went through the draft agreement. He appreciated the draft and the next morning he and I signed the agreement along with our Hungarian counterparts. This opened a new field for me and thereafter HCC involved me in most of the joint ventures.

After discussions with the Hungarians, we also visited metros in Prague and Belgrade to see shields where Hungarian Technology was under use. The purpose of our visit to Europe and meetings with the Hungarians was not only to formulate a technical joint venture agreement but also to collect information to enable me to work out a competitive tender bid.

HCC submitted its bid and won the contract from Calcutta Metro Rail Corporation. HCC submitted its bid and won the contract from Calcutta Metro Rail Corporation. The work was completed successfully with the help of Hungarian Technical know-how. HCC also won the contract for another section of the Calcutta Metro from Chitpur Railway Yard to Belgachia Tram Depot which was also to be constructed with the help of Shields and successfully with the help of Hungarian Technical know-how.

**- रमाकांत विद्वांस, (पृ.६२३)**

३१,गुडविल ॲश्युरन्स सोसायटी, बीपीएल मोबाईल सेंटरच्यामागे, मनमाला टँक रोड, माटुंगा (प.), दूरध्वनी : ०२२-२४३०५२६०

# माणिकमधून मोती बरसले!!!

**- निरंजन मराठे (पृ. १२०)**



कर्नाळा साक्शी आणि माणिकगड हे कर्जत रांगेतील एक दुर्ग त्रिकुट. यातील माणिकगडला १४ सप्टेंबर २०१३ रोजी जायचे ठरले. दादरऐवजी पनवेल हा मीटिंग पॉइंट ठरला. नेहमी स्वत:च्या गाडीने जाऊन ट्रेक करतो. या वेळी थोडे वेगळे करू या म्हणून पब्लिक बसने जायचे ठरले. मीठरल्याप्रमाणे पनवेल स्टेशन गाठले आणि उत्कर्षचा फोन आला प्रथमेश उशिरा येतो आहे. साडे आठपर्यंत अनू आणि नीलम डेपोला हजर. प्रथमेशचा काही पत्ता नव्हता शेवटी वाट पाहून आम्ही विसावा हॉटेल गाठले आणि नाश्ता करण्याचा मनसुबा आखला. तोपर्यंत प्रथमेश हजर झाला. एक टमटम पकडून रसायनी आणि पुढे वडगाव गाठले तोपर्यंत अकरा वाजून गेले होते.

आम्ही किल्ल्याकडे कूच केले. मध्येच एक दलदलीचा टप्पा लागला आणि तो पार करून आम्ही दोन झाडांच्या खाली येऊन बसलो. नीलमने डबा उघडला. पण इडली काही पोटाखाली उतरेना. पाणीदेखील फारच कमी होते. जवळपास फक्त ८लिटर. आकाशात सूयाची जोरदार तपश्चर्या चालू होती. पठारावर पठार पायदळी तुडवत मार्गक्रमण चालू होते. माणिकगड एखाद्या साधूसारखा ध्यानस्थ बसलेला भासत होता. फोटो काढत आम्ही माणिकगड जवळ करीत होतो. गावातील काही मंडळी थोड्या वेळाने आमच्या साथीला आली. कुऱ्हाड, कोयता अशा वस्तू जवळ होत्या, झाडे तोडायला!

एका ठिकाणी आम्ही थांबलो तर एक गावकरी परत मागे आला आणि म्हणाला, आता अजून अर्धा तास आहे. त्याचा अर्थ तास म्हणजे आपला जवळपास दीड तास. मी उत्कर्षला सांगितले, मागे फिरू या. आता बस झाले. अनू आणि नीलमनेदेखील दुजोरा दिला. प्रथमेश थोडा खट्टू झाला. आणि परतीचा मार्ग धरला. वेळ होती जवळपास साडेतीनची. झऱ्याजवळ थांबून जेवण घेतले आणि अर्धा तास आराम केला. आता जीवात जीव आला होता. उत्कर्षची पाठदुखी आता कमी झाली होती. परतताना आम्हाला एक मळकट वाट दिसली आणि ती धरून आम्ही गावाकडे कूच करू लागलो. म्हातारी आकाशात दळण दळायला लागली आणि एक गाईबैलाचा कळप जोरदार धावताना दिसला. असे वाटले की, बिबट्या मागे लागला आहे त्याच्या. आम्हीही आमचा वेग वाढवला आणि ठाकूरवाडी गाव गाठले. गावात बिबट्याविषयी चौकशी केली असता कळले जंगलात आहेत, पण रात्री बाहेर पडतात क्वचित! विजांचा लकलकाट, पाऊसदेखील सुरू झाला होता. उभ्या आडव्या विजा दिसत होत्या आणि हारातून मोती पडावे अशा पडतदेखील होत्या. मोबाईल कॅमेरा सर्व बंद केले आणि पुढे वाशिवली गाव टप्प्यात आले होते. डोळ्यांसमोर एक क्षणभर अंधाराचे साम्राज्य पसरले होते. थोडक्यात म्हणजे काय तर वीज पडली होती. देवाची कृपा म्हणून ती त्या लोखंडाच्या बार असलेल्या अर्धवट अशा कारखान्यावर पडली. देवाचे नाव घेत जीव मुठीत घेऊन गाव गाठले. ट्रेक पूर्ण झाला नव्हता; पण वीज पडते म्हणून वाशिवलीमधून बस पकडून तडक पनवेल आणि मग घर गाठले ते परत माणिकगडला यायचे तो ट्रेक पूर्ण करायलाच असे म्हणून. पण हे म्हणू शकलो कारण शीर सलामत होते. शीर सलामत तो पगडी पचास या म्हणीचा आणि वीज पडणे या वाक्प्रचाराची माणिकगडच्या ट्रेकमध्ये प्रचिती आली होती.

**- निरंजन मराठे (पृ. १२०)**

(शनिवार १६ नोव्हेंबर २०१३, दैनिक सामना वरून साभार)

# 'दीवा'

**सौ. जयश्री विनायक मराठे (पृ. ३०७)**

नुकताच दिव्यांचा उत्सव म्हणजे दीपावली साजरी झाली. घरोघरी दीपावलीला वसुबारसेपासून सुरुवात होते. घरासमोर पणत्यांचे दीवे, आकाशकंदील लावले जातात. संध्याकाळी गाय व वासरू यांची फुलाने पूजा करून निरांजन ओवाळले जाते.

धनत्रयोदशीला लक्ष्मीची मूर्ती व धंद्याच्या वह्या, हत्यारे पाटावून ठेऊन त्यांची पूजा करून त्यांना दिव्याने ओवाळले जाते. धने व गूळ यांचा नैवेद्य दाखवितात. हा व्यापाऱ्यांचा महत्त्वाचा दिवस असतो. घराबाहेर दक्षिणेकडे तोंड करून कणकेचा दिवा लावला जातो. घराच अपमृत्यू होऊ नये म्हणून हा दिवा यमराजाला अर्पण केला जातो. यालाच यमदीपदान म्हणतात यामुळे नरकवास भोगावा लागत नाही. घराबाहेर पणत्या, कंदील लावले जातात. याच दिवशी दिवा ओवाळून धन्वंतरीची पूजा करतात. (आरोग्य देवता धन्वंतरी)

नरकासूरला कृष्णाने रात्री ठार मारून हजारो स्त्रियांची नरकासूराच्या कैदेतून सुटका केली म्हणून आनंद साजरा करण्यासाठी पहाटे पणत्या, आकाशकंदील लावून लोकांनी दीपोत्सव साजरा केला. पहाटे केरसुणीची पूजा करून सात पणत्या लावतात.

लक्ष्मीपूजनाला लक्ष्मी, कुबेर व धन यांची संध्याकाळी साग्रसंगीत पूजा करून दीवे ओवाळून आरती केली जाते. घराबाहेर पणत्या, कंदील लावून रांगोळ्या काढल्या जातात. स्त्रिया एकमेकींना हळद-कुंकूसाठी बोलवितात. लक्ष्मीलालाह्या, बत्तासे यांचा नैवेद्य दाखवितात. भरपूर फटाके वाजवतात, आतिषबाजी केली जाते.

बलिप्रतिपदा हा साडेतीन मुहूर्तातला दिवस. विष्णूने वामन अवतार घेऊन बळी राजाकडे तीन पावले जमीन मागितली. चवथे पाऊल ठेवायहला बळीकडे जागा मागितली. बळीराजा हा उदार होता. (राक्षस कुळातील राजा प्रल्हादाचा नातू) त्याने वामनाला चवथे पाऊल स्वत:च्या डोक्यावर ठेवायला सांगितले. वामनाने त्याच्या डोक्यावर चवथे पाऊल ठेवून त्याला पाताळात लोटले. पाताळाचे त्याला राज्य दिले. वाईट माणसातसुद्धा शुभत्व असते. हे पाहण्याचा हा दिवस. स्त्रियांनी पतीला दिव्याने ओवाळले व पतीने पत्नीला ओवाळणी देणेचा दिवस.

भाऊ-बहिणीच्या मंगल प्रेमाचा भाऊबीच हा दिवस. बहीण भावाला दिव्याने ओवाळते. भाऊ-बहिणीला प्रेमभावनेने ओवाळणी देतो.

या सहा दिवसांच्या दीपोत्सवात दिव्याला किती महत्त्व आहे हे दिसून येते.

रोज संध्याकाळी सूर्य मावळल्यावर अंधार पडायला सुरुवात होते, तेव्हा आपण देवापुढे दिवा लावून दिव्या, दिव्या दीपत्कार कानी कुंडले मोतीहार दिव्याला पाहून नमस्कार असा दिव्याचे महत्त्व असलेला श्लोक म्हणतो.

हिंदू धर्मात दीपदानाला अतिशय महत्त्व आहे. अधिक महिन्यात तेहतीस दिवे दान देतात. (निरांजने) संक्रांतीला स्त्रिया निरांजने लुटतात. कार्तिक महिन्यात विष्णू देवा समोर दिवा लावल्याने तुला दानाचे पुण्य मिळते व पितरांचा उद्धार होतो. सर्व तीर्थात अवगाहन केल्याचे पुण्य मिळते.

मंदिरासमोर दीपमाळ बांधणे हे पुण्य कृत्य समजतात. शंकराच्या देवळासमोर दीपमाळ असते. तिथे त्रिपुरी पौर्णिमेला दिवे लावले जातात. श्रीआदिशक्तीच्या देवळासमोर दीपमाळ असते. तिथे नवरात्रीत दिवे लावले जातात. खंडोबाच्या दर्शनाला जाताना ज्या पायऱ्या आपण चढतो तिथे ३५० दीपमाळेचे खांब आहेत. तिथे त्याच्या नवरात्रात दिवे लावतात.

औक्षण म्हणजे आयुष्यवर्धन. जसे दिवाळी पाडवा - पती-पत्नी, भाऊबीज बहीण-भाऊ, वसुबारस गाय-वासरू, बैलपोळा बैलांना ओवाळणे असते. तसेच अनेक मंगल कार्यात अनेक वेळा औक्षण म्हणजेच दिवा ओवाळणे करतात. वाढदिवसाला औक्षण करतात. कोजागिरी पौर्णिमेला मोठ्या अपत्याला औक्षण करतात.

जशी दिवाळीतली अमावस्या पवित्र मानली जाते तशीच आषाढ अमावस्याही पवित्र मानतात. सर्व दीवे स्वच्छ घासून, पुसून, लावून त्यांची पूजा केली जाते. सूर्य व चंद्र यांची युती म्हणजे काळोख हा अंधार नाहिसा व्हावा म्हणून अमावस्येला दिवे पाजळावेत.

दिवा हा प्रकाशरूपाने सूर्याचा प्रतिनिधी असतो. तसेच ज्वलनाच्या रूपाने अग्निचा प्रतिनिधी असतो. देवांची आपण षोडशोपचार पूजा करतो. त्यामध्ये पूजा झाल्यावर दीपाने आरती करणे हा एक उपचार असतो. देवळात पहाटे काकड आरती व रात्री शेजारती दिव्यानेच करतो. प्रयाग, काशी येथे गंगेची, नाशिक येथे गोदावरीची वगैरे नद्यांच्याकाठी दीप उजळून आरत्या करतात. मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी द्रोणात दिवे लावून नदीच्या पात्रात सोडतात.

दिव्याबद्दल काही संकेत आहेत. १. देवापुढे लावलेला दिवा चोरणारा आंधळा होतो. २. दिव्यावर फुंकर घालणारा तिरळा होतो. ३. भूमीवर नुसता दिवा ठेवू नये. तिला त्याचा ताप सहन होत नाही.

शेवटी जाता-जाता मरणानंतर दक्षिणेकडे तोंड करून दिवा लावला जातो. अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा मार्ग दाखविण्यासाठी.या दिव्याचे महत्त्व अबाधित आहे. ते तसेच राहणार, दिव्याचे ऋण फेडण्यासाठी वराऔल सर्व गोष्टी आपण करीत असतो.

श्री दीपायनम:।

**सौ. जयश्री विनायक मराठे,**
**(पृ. ३०७)**
६/७ श्रीकुटीर को.ऑप.हा.सोसायटी, डोंबिवली (पू.)
दूरध्वनी : २४२४४०

**विद्या, विनय आणि शील ही माणसाची तीन दैवते आहेत.**

Marathe Pratishthan

# स्वामी विवेकानंद : 'एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व'

श्रीमत कुमुद डोके (मराठे पृ.३६६)

*विश्वनाथ दत्त घराणे बंगाल प्रांती,*
*विद्वत्ता, संपदा घरी पाणी भरती।*
*भुवनेश्वरींचा बिले नरेंद्र,*
*खट्याळ खोडकर निर्भिड सुरेंद्र ॥*

बंगालमध्ये कलकत्त्याच्या दत्तभवन कुटुंबात, मुलामाणसांची अखंड वर्दळ असे. कायम पाहुण्यांन घर गजबलेले. शेजाऱ्यांच्या झाडावर लोंबकळणाऱ्या खेळ खेळून मुले गोंगाट करीत होती. घरमालकाने बाहेर येऊन दटावले, ''झाडावर ब्रह्मराक्षस आहे, तो तुम्हाला खाऊन टाकील. मुले घाबरून पळून गेली. उरला फक्त नरेंद्र. धीटाईने म्हणाला, ''कोण ब्रह्मराक्षस मानगुटीवर बसतो ते पाहायचेच आहे मला.'' हाच तो नरेंद्र, ज्यांनी रामकृष्ण परमहंसांचे वेदांत तत्त्वज्ञान अखिल विश्वात पोहोचविले.''

नरेंद्राला लहानपणापासूनच कुस्ती, फूटबॉल अशा देशी खेळांची मनस्वी आवड व गती होती. त्यांनी जगभर केलेल्या भाषणात श्रोत्यांना सतत बलदंड बनण्याचे आव्हान केले. फुटबॉलची किक जितकी जोरात माराल तितका चेंडू उंच आकाशस्थ देवाजवळ पोहोचेल. व्यायामाशिवाय गीतापठाण फोल आहे. दुबळे शरीर हे कुचकामीच. ''उठा राष्ट्रवीर हो, उठा चला सशस्त्र व्हा.'' असाच संदेश यातून आपणास पोहोचतो.

रायपूर संस्थानात मुक्काम असताना नरेंद्रांनी वडील खुशीत असताना विचारले, ''आपल्या विचारांचा वारसा आम्हाला लाभला, पण भविष्याची तरतूद काय?'' भिंतीवरील राजेशाही आरशात बघ. म्हणून विश्वनाथ हसले. ''भव्य कपाळ, टपोरे डोळे, पुष्ट छाती, बलदंड बाहू, गोल चेहरा, साजेशी उंच, अशी उत्तम शरीरयष्टीची देणगी'' प्रतिबिंबात प्रत्ययाला आली. नरेंद्र निरुत्तर झाले. आपली अलौकिक ओळख सिद्ध करण्याच्या उद्योगाला लागेल.

शालेय जीवनातील ज्येष्ठ शिक्षक निवृत्त होतानाच्या शुभेच्छा समारंभाचा प्रसंग आपल्या कर्तव्यदक्ष व प्रिय, शिक्षकांविषयी भाषणाची संधी नरेंद्रांना मिळाली. नरेंद्रच्या प्रभावी भाषणास अध्यक्षांनीदेखील गौरविले. सर्वधर्मपरिषदेत केलेल्या अर्थपूर्ण भाषणाची जणू ही रंगीत तालीम होती. नरेंद्रांचे वडीलही उत्तम वक्ते, संगीततज्ज्ञ व समाजसुधारक होते. तत्कालीन बालविवाह, सतीसारख्या प्रथांविरुद्ध त्यांनी बंड पुकारले. विधवाविवाहात पुढाकार घेऊन स्वत:च्या कुटुंबातील स्त्रियांच्या पाठीशी खंबीर उभे राहिले. बंगाली व हिंदीत 'शिष्टाचार भारती' ग्रंथ लिहिणारे विद्वान पिताश्री नरेंद्रांना लागले. घरच्या सांगितिक वातावरणातून प्रेरणा घेऊन अवघ्या तेविसाव्या वर्षी नरेंद्र दत्तांनी 'संगीत कल्पतरू' ग्रंथाची निर्मिती केली. माँ शारदाजींचा गुणी नरेन, जगी चमकतो तेजस्वी वीरेन..''

पितृवियोगाचे दु:ख पचवून नरेंद्र दक्षिणश्वेरी रामकृष्ण परमहंसांच्या गुरुगृहात आले. विकल व बिकट अवस्थेतील नरेंद्र गुरुदेवांच्या सान्निध्यात मन:शांती मिळवू शकले. गुरुआज्ञेप्रमाणे कालीमातेला अनन्यभावे शरण जाऊन दिव्य दर्शन प्राप्तकर्ते झाले. नरेंद्र ही अलौकिक अवस्था क्रमत असता, दिव्यदर्शनाने दिपलेल्या डोळ्यांतून अश्रू ओघळले. गुरुदेवांनी विचारले, ''नोरेन मागितलेस ना हवे ते?'' नरेंद्र उत्तरले, ''देवीच्या दर्शनापुढे संसारिक गरजा विसरून गेलो, अद्‌भुत दर्शनाने मन तृप्त झाले'' गुरुदेव मनातून संतुष्ट झाले. त्यांनी शत: आशीर्वाद शिष्याला दिले. वयाची १८ ते २३ पर्यंतची वर्षे नरेंद्रांना गुरुबांधवांसह चर्चा, अनुष्ठान, गुरूसेवा, साधनांचा अलभ्य लाभ मिळाला. ईश्वर विद्यासागरांच्या शाळेत संस्कृत व इंग्रजी विषयांच्या अध्यापनाची संधी मिळाली. तरुणाईला नवविचार, ज्ञान, विज्ञान व आचरणाचे महात्म्य त्यांनी आनंदाने पटवून दिले. स्वत:च्या गुरुंचीही परीक्षा घेऊन खात्री पटल्यावरच त्यांचे श्रेष्ठत्व मानणारे शिष्य विरळाच, आसनाखाली एक नाणे ठेवून नरेंद्राने पाहिले. विंचू डसल्याप्रमाणे ताडकन उठून गुरुदेव उभे राहिले. नरेंद्राचा भ्रमनिरास झाला. मी सांगतो म्हणून नाही तुला पटले तरच, अनुभव घेऊनच विश्वास ठेवू असा सल्ला देणारे गुरु परमहंसांशिवाय कोठे आढळणार?'' घशाच्या कर्करोगाने ग्रासले असता गुरुदेव नरेंद्रांना म्हणाले, ''या (माझ्या) देहात राम आणि कृष्ण दोन्ही आहेत. माझी सर्व शक्ती मी तुझे ठायी रुपांतरित करीत आहे, वेदांताचा प्रसार, अखिल जगतात करण्याची क्षमता फक्त तुझे ठायी आहे. नरेंद्रा तूच ते काम करशील, नव्हे मी करवून घेईन.'' केवढा हा अपार विश्वास!

गुरुदेवांचा हा विश्वास सार्थ ठरविण्याचा स्वामी विवेकानंदांनी चंग बांधला. त्रिपुरी पौर्णिमेला 'नरेंद्रांनी (स्वामींनी) माणूस घडविण्याचे कार्य कितीही संकटे आली तरी न डगमगता पार पाडीन, असा दृढ संकल्प केला देशबांधवांना आव्हान केले.''

'उत्तिष्ठत, जाग्रत प्राप्यवरान निबोधत'' रामकृष्ण मिशनचे कार्य सुरू झाले.

संपूर्ण भारत भ्रमण करून एतद्देशीय परिस्थिती समजावून घेऊन हिमालय ते त्रिवेंद्रम, गुजराथ ते आसाम सर्व देशबांधवांचे आशीर्वाद घेऊन स्वामी मार्गस्थ झाले. कन्याकुमारीचे तेजस्वी दर्शन घेऊन, राजेमहाराजांचे उत्स्फूर्त सहाय्य घेऊन अमेरिकेत बोस्टन, शिकागो शहरी पोहोचले. परदेशवासियांनी स्वामींचे जंगी स्वागत केले.

वसे चित्ती ज्याच्या शांत सुगंध,
कठोर तपसाधनेत परमानंद
संचार देशी विदेशी जयाचा
असे पुत्र तो पूज्य भारतभूचा

सर्वधर्मपरिषदेत हिंदू धर्माचे प्रतिनिधी म्हणून स्वामींनी भाषणास सुरुवात केली. ''अमेरिकेतील माझ्या भगिनींनो, बंधूंनो, माय सिस्टर्स आणि ब्रदर्स या जादूभऱ्या शब्दांनी व सोबतच्या टाळ्यांच्या कडकडाटांनी दोन मिनिटे आसमंत दुमदुमला. अवाक् होऊन उभ्या राहिलेल्या श्रोत्यांना थांबवून स्वामींनी भाषणास सुरुवात केली.

''जगातील सर्वांत प्राचीन, सर्व वर्ण,

Marathe Pratishthan

संप्रदायाच्या कोटी कोटी हिंदू नरनारींच्या वतीने या समन्वयाच्या अमेरिकेच्या महान उपक्रमाला मी त्रिवार धन्यवाद देतो. मानवाला पापी म्हणणं, हेच मुळात महापाप आहे. वेदांताचा विचार व आचरण सर्वांनाच स्वत:चा उद्धार करण्यास पुरेसे आहे. प्रत्येकाने स्वत:चे वैशिष्ट्य कायम राखून, अन्य धर्मातील सारभाग ग्रहण केला पाहिजे. स्वत: विकास साधला पाहिजे.''

अमेरिका, युरोप येथील शेकडो व्याख्यानातून स्वामींना प्रो. राईट, मि. ब्राऊन, मिस कॅथरीन बोर्न, मिस ग्रिस्टी डेल असे असंख्य मदतनीस उत्तम शिष्य व शिष्या लाभल्या. सोपी उदाहरणळालो देऊन आपला मुद्दा विवेकानंद उत्तम पटवून देत. श्रोत्यांवर परिणाकारक व अचूक संदेश जाई. एका श्रोत्याला उत्तर देताना जे म्हणतात, ''हिंदुस्थानात तुम्हास असे दिसेल की एखाद्या खेड्यातील चरख्यावर सूत कातणारी मुलगी म्हणते, ''तुमच्या द्वैताच्या गोष्टी मला सांगू नका, माझा चरखाच बोलतो' सोहम सोहम मी तोच आहे, तोच मी आहे.'' अशा साध्या विषयात महान आशय शोधणाऱ्या त्याचे मर्म लोकांसमोर आणणाऱ्या विवेकानंदाचे देशप्रेम व स्त्री दाक्षिण्य किती असाधारण असेल. सर्व जगात भारतमातेचा गौरव व श्रेष्ठत्व प्रस्थापित करून स्वामीजी भारतात परतले. देशवासियांनी उत्स्फूर्त स्वागत केले.''

सध्याच्या परिस्थितीत हिंसाचार, आीक्रमणे, मानवीय, पर्यावरण संहार पाहताना क्षणभर वाटते. आकाशस्थ ताऱ्यात अढळ स्थान मिळालेला भारतमातेचा सुपुत्र आपणास पुन:श्च आठवण करून देत आहे, ''तुम्ही अमृताचे पुत्र आहात. स्वत्व विसरू नका, स्वत:चे ध्येय निश्चित ठरवा. मातृभूमीला पूर्वीप्रमाणे सुजलाम सुफलाम बनवा.''

सर्व धर्मपरिषदेची सांगता झाल्यावर एका प्रतिनिधीने स्वामीजींना विचारले, ''शिकागो परिषदेची फलश्रुती आपण काय सांगाल?'' स्वामी उत्तरले, ''मला भेटलेल्या तीन शिष्या, केवळ माझ्यासाठी नव्हे भारतासाठीही मोठीच फलश्रुती आहे''

पश्चिमेस तीन शिष्या लाभती, शिकागोची हीच फलश्रुती.

निवेदिता, हरिदासी आणि ख्रिस्तीन, ब्रह्माविष्णू, महेश जणू तीन.

स्वामीजींच्या अल्पायुष्यातील अफाट कार्य सद्यस्थितीतही किती उद्‌बोधक, मार्गदर्शक प्रेरणादायी आहे. ११ सप्टेंबर ह्या शुभदिनानिमित्त स्वामींनी देवासियांना सूचित केलेला मंत्र आपण गर्जू या.

वेदमंत्र हाच आम्हा मंत्र वंदे मातरम्, मंत्र वन्दे मातरम् ॥

जयहिंद

**- श्रीमती कुमुद डोके (पृ.३६६)**

अ-२, १०५/१०६ 'गिरीजा'
नीलकंठ हाईटस, पोखरण रोड नं. २
ठाणे (प.) ४०० ४०६
फोन : ०२२-२५८८१६५५

## अमृताच्या पुत्रांनो,

*विश्वनाथदत्त घराणे बंगाल प्रांती,*
*विद्वत्ता, संपदा घरी पाणी भरती,*
*भुवनेश्वरींचा बिले नरेंद्र*
*खट्याळ खोडकर निर्भिड सुरेंद्र ॥१॥*

*वसे चित्ती ज्याच्या शांती सुगंध*
*कठोर तपसाधनेत परमानंद*
*संचार देशी विदेशी जयाचा*
*असे पुत्र तो पूज्य भारतभूचा ॥२॥*

*सर्व धर्म परिषदेची फलश्रुती*
*हरि दासी निवेदिता ख्रिस्ताईन इति.*
*परमानंदांचा शिष्योत्तम दक्ष*
*प्रणाम त्यासी लक्षानुलक्षा... ॥३॥*

- श्रीमती कुमुद डोके, (पृ.३६६) ठाणे

## सहवेदना

मठ येथील मधुसूदन यशवंत मराठे (पृ.५९) यांचे पुणे येथील के.ई.एम. रुग्णालयात नुकतेच हृदयविकाराने निधन झाले. ते पुणे येथील के.ई.एम. रुग्णालयात असिस्टंट टू मेडिकल डायरेक्टर पदावर कार्यरत होते. कामावर असताना त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई, बंधू, पुतणे असा मोठा परिवार आहे.

मराठे प्रतिष्ठानचे कृतीशील कार्यकर्ते मठ येथील आंबा बागयतदार व स्वयंभू मंगल कार्यालयाचे मालक श्री. सुरेश मराठे यांचे ते बंधू होत. मराठे प्रतिष्ठानला ह्यांनी आपल्या भावाच्या स्मृतीप्रीत्यर्थ २०००/- रुपये देणगी दिली आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. मधुसूदन यशवंत मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



Marathe Pratishthan

# बंदी गणपत गोविंदा शिंदे

**अच्युत महादेव चक्रदेव (पृ.७३२)**

सुमारे १९८४-८५ हे साल. त्या वेळी मी नाशिकमार्ग मध्यवर्ती कारागृहात नोकरीला होतो. माझ्या कार्यालयात त्या वेळी बंदी वॉर्डर म्हणून गणपत गोविंदा शिंदे हा कामासाठी नेमला होता. साधारण पाच फूटाचे आसपास उंची. सगळेच काम मन लावून करण्याचा छंद. त्यामुळे माझ्याबरोबरच इतर विभागांची कामेसुद्धा तो स्वखुशीने स्वीकारून यशस्वीपणे त्याची पूर्तता करीत असे. मूळचा गुजरातचा पण काही व्यवसायामुळे तो नागपूरला आला. तिथे 'घरगडी' म्हणून त्याने एका श्रीमंत वृद्ध आजींकडे नोकरी पत्करली. आजींचे घराजवळील एका झोपडपट्टीत तो राहू लागला. तेथीलच एका सुयोग्य मुलीबरोबर त्याचे लग्न झाल. संसार सुरू झाला. त्याबरोबरच संसारिक, आर्थिक ओढाताणही सुरू झाला. मधूनमधून तो वृद्ध आजींकडूनही पैशाची मागणी करू लागला. त्याही त्याचे काम पाहून त्याची गरज भागवू लागल्या. एकदा फारच मोठी आर्थिक अडचण निर्माण झाली. कोणाकडूनही पूर्तता होईना. वृद्ध आजींनीही कानावर हात ठेवले व असे सारखे पैसे मागायचे असतील तर 'माझ्याकडे काम करू नकोस. दुसरीकडे काम पाहा.' अशी तंबी दिली. गणपतला वृद्ध आजींशिवाय तूर्त दुसरा पर्याय नव्हता. आजी रक्कम नेमकी कुठे ठेवत हे त्याला माहीत झाले होते. एके दिवशी संध्याकाळी काम संपल्यावर गणपतने घरातील मोठ्या कपाटाकडे मोर्चा वळवला. त्याने कपाटाचे दार उघडले व तो विशिष्ट खणामधून पैसे काढून घेऊ लागला. कपाटाचे दार उघडताना मोठा आवाज झाला होता. तो ऐकून त्या त्वरेने कपाटाकडे आल्या व गणपतला पैसे चोरताना पाहून त्या संतापल्या व गणपतला शिव्या देऊ लागल्या. गणपतच्याही मनावरील ताबा सुटला आणि आपले बिंग आता फुटेल या भीतीने त्याने कोपऱ्यातला एक लोखंडी जाड रॉड आजींचे दिशेने भिरकावला. वृद्ध आजींच्या डोक्यात तो वर्मी बसून त्या खाली कोसळल्या. त्यांचे डोक्यामधून रक्तस्राव सुरू झाला. ही गडबड ऐकून शेजारच्या घरातली माणसे जमा झाली. त्यातील एकाने त्वरीत पोलीस स्टेशनशी संपर्क साधला. पोलीसपथक तात्काळ आले. थोडीफार चौकशी प्राथमिक स्वरूपात करून इन्स्पेक्टर साहेबांनी गणपतला अटक केली. चोरी व मनुष्यवध अशी दोन कलमे गणपतविरुद्ध लावली गेली. यथावकाश खटला सुरू झाला. पुराव्यानिशी दोन्ही कलमांमध्ये तो गुन्हेगार ठरला. सत्र न्यायमूर्तींनी गणपतला जन्मठेप सुनावली आणि ही शिक्षा तो नागपूर कारागृहात भोगू लागला. पुढे तेथून त्याची बदली वॉर्डर म्हणून नाशिक मार्ग मध्यवर्ती कारागृहात झाली. तिथेच एके दिवशी मी त्याचेवर प्रश्नांची सरबत्ती केल्यावर त्याने वरीलप्रमाणे सर्व हकिकत मला सांगितली. शिक्षा भोगतानाच त्याने लेखन-वाचन चालू ठेवले होते. कारागृहाच्या सर्व उद्योग विभागात त्याने मन:पूर्वक काम केले. तुरुंग प्रशासन पद्धतीप्रमाणे जवळपास सरळ सरळ शिक्षेची सोळा वर्षे पूर्ण केल्यावर ही सोळा वर्षे अधिक मिळालेली माफीची चार वर्षे अशी एकूण वीस वर्षं शिक्षा भोगल्यावर सल्लागार मंडळापुढे त्याचे प्रकरण सादर केल गेले. व त्याचे मुक्ततेचे आदेश निघाले व तो साधारण १९९४ च्या सुमारास कारागृहातून मुक्त झाला. मुक्ततेनंतर तो नागपूरला त्याचे घरी झोपडपट्टीत गेला. मुक्तता होऊनही पोलीस स्टेशनची हजेरी त्याला आठवड्यातून एकदा द्यावी लागे. याला तो कंटाळला आणि बायकोला घेऊन पुण्याला आला. झोपडपट्टीतही काही तथाकथित गुंड पुढाऱ्यांशीही त्याचे पटले नाही. मधल्या कालावधीत नोकरीमधून मीही निवृत्त होऊन पुण्याला स्थायिक झालो होतो. असाच एका रविवारी मी घरी विश्रांती घेत असताना अचानक दारावरची बेल वाजली म्हणून मी त्वरेने दार उघडले. समोर पाहतो तो दारात गणपत शिंदे उभा. मला आश्चर्य वाटले. मी विचाले, ''काय गणपत तू इथे कसा?'' यावर गणपतने मला आधी साष्टांग नमस्कार घातला. ''साहेब, मी टेलिफोन डिरेक्टरीतून तुमचा पत्ता व नंबर शोधून काढला. मला काहीतरी काम मिळवून द्या. मी माझ्या बायकोलाही घेऊन आलो आहे.'' मी त्याला बायोकालाही घरी घेऊन यायला सांगितले. व कामाचे नंतर पाहू म्हणालो. अचानक माझ्या 'कैदी पुनर्वसनाचे'काम करणाऱ्या 'नवजीवन मंडळा'चे काम लक्षात आले. मीही त्या मंडळात 'संपर्काधिकारी' म्हणून काम करीत होतो.

मी ताबडतोब मंडळाचे अध्यक्ष श्री. रानडेसाहेब यांना फोन केला. गणपत शिंदेचे सर्व प्रकरण त्यांना समजावले व मंडळाचे फुलेनगरमधील जागेत गणपतची सोय करण्यासाठी त्यांची परवानगी मागितली. त्यांनी मीच गणपतची शिफारस करतो आहे हे लक्षात घेऊन परवानगी दिली. गणपत मंडळाचे जागेत पंधरा दिवस पत्नीसह व्यवस्थितपणे राहिला. तिथे त्याने तेथील वॉचमनचा विश्वास संपादन केला. मधल्या काळात त्याला एक ख्रिस्ती धर्मोपदेशक भेटले व त्यांनी गणपतला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. गणपत मलाही धर्मोपदेशकांना भेटायला घेऊन गेला. सर्व विचार केल्यावर मला गणपतच्या धर्मांतराबद्दल शंका निर्माण झाली. मी गणपतला तसे सांगितले व गणपतला माझ्या एका उद्योगपती मित्राकडे पाठवून दिले. कारण नवजीवन मंडळाची जागा सोडायलाच पाहिजे होती. माझ्या उद्योगपती मित्राने गणपत व त्याची बायको दोघांनाही काम दिले व तेथीलच एका आऊटहाऊसमध्ये राहायला जागा दिली. तिथेही गणपतने चांगला जम बसवला. पण कारखान्यांत प्रत्येक बाबतीत तो स्वत:च्याच्या हेका चालवू लागला. तेथील युनियनचे पुढाऱ्यांबरोबर त्याचे जमले नाही आणि हेच त्याचे आड आले. मधल्या काळात त्याला एक मुलगा व एक मुलगी झाली. मी मुलांच्या बारश्यालाही गेलो होतो. कशावरून नक्की समजले नाही, पण गणपत व माझ्या उद्योगपती

Marathe Pratishthan

मित्रामध्ये वाद निर्माण होऊन ते वाद विकोपाला गेले आणि त्याचे पर्यवसान गणपतची नोकरी सुटण्यात झाले. पुन्हा पहिले पाढे पंचावन्न. गणपत एके दिवशी अचानक माझ्यासमोर माझ्या घरी बायको-मुलांसह उभा राहिला. मी माझे मित्राकडे त्याचे बद्दल रदबदली करून पाहिली. परंतु मित्राने त्याला नोकरी देण्याचे साफ नाकारले. मात्र त्याने गणपतला पैशाची मदत केली. गणपतने काही रक्कम माझेकडून घेतली व त्याने वडगाव शेरी येथे एक लाँड्री सुरू केली. तो फक्त कपड्यांना इस्त्री करण्याचे काम करी. त्याच जागेत त्याने शिंपी काम सुरू केले. गणपत केव्हा तरी येऊन मला त्याची खुशाली कळवीत असे. अशाच एका भेटीत त्याने त्याचा अहमदाबाद येथे जाऊन तेथे काहीतरी व्यवसाय करायचा मनोदय व्यक्त केला. व पुढे हा मनोदय त्याने प्रत्यक्षात आणला.

बऱ्याच दिवसात गणपतची काहीच खुशाली कळली नाही. तो जिथे असेल तिथे त्यांचे कुटुंबियांसह सुखात असो हीच सदिच्छा!

- अच्युत म. चक्रदेव
कारागृह अधिक्षक (निवृत्त)
२६शुक्रवार पेठ, पुणे -२ भ्रमणध्वनी : ९६२५३५५०६३३

## हितगुज वर्गणीदार-देणगीदार कुलबांधवांची नावे

श्री. रामचंद्र वामन खांबेटे यांनी २०,०००/- रुपये हितगुजला देणगी म्हणून दिले त्याबद्दल श्री. रामचंद्र वामन खांबेटे यांचे विशेष आभार.

श्री. उपेंद्र वामन मराठे, ठाणे, श्री. पुरुषोत्तम वामन मराठे, मिरज-सावळीरोड, सौ. शिल्पा टेंगसे, मराठे-नालासोपारा, श्रीमती निर्मला जनार्दन मराठे, भोपाळ, श्री. श्रीपाद जनार्दन मराठे, भोपाळ, श्री. अशोक यशवंत विद्वांस, पार्ले

हितगुजला वर्गणी-देणगी दिलेल्या सर्व कुलबांधवांचे आभार. अनवधनाने एखादे नाव राहिले असल्यास क्षमस्व.

**विशेष सूचना : 'हितगुज' राखीव फंड निधी शक्यतो चेकद्वारे 'मराठे प्रतिष्ठान' या नावाने संपादिकेच्या पत्त्यावर पाठवावा.तसेच मराठे प्रतिष्ठानची सारस्वत कॉपरेटिव्ह बँक, वरळी शाखा,**
**अकाऊंट नंबर : ०१०२००१०००२२४४८ IFSC CODE : SRCB0000010 असा आहे.**
**येथे फंड निधी जमा करा. जमा केल्यास आपले नाव कळवावे.**

## नांदा सौख्यभरे

पुण्याचे मराठे ज्वेलर्स श्री. मिलिंद मराठे आणि सौ. नीना मराठे ह्यांची सुकन्या सौ. कां. देबश्री हिचा शुभविवाह चि. श्री. नीरज राजीव दांडेकर यांजबरोबर संपन्न झाला. शनिवार दिनांक ३० नोव्हेंबर २०१३ला संध्याकाळी ७.३० वाजता शुभारंभ लॉन्स, पुणे या ठिकाणी स्वागत समारंभ थाटामाटात साजरा झाला.
मराठे प्रतिष्ठानद्वारा वधू-वरांना अनेक शुभाशीर्वाद!

## दानशूर वा. ग. (पृ. ५०३)

मराठे प्रतिष्ठानचे आधारस्तंभ श्री. वामन गणेश मराठे आणि कुटुंबीय यांनी रुपये ५१,०००/- रिफंडेबल शिष्यवृत्ती नॅनोटेक्नोलॉजीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देणगी म्हणून मराठे प्रतिष्ठानला दिले. वा. ग. च्या पत्नी सौ. वृषाली याही उपस्थित होत्या. कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांनी टाळ्या वाजवून देणगी दिल्याबद्दल वा. ग. मराठे यांचे आभार मानले.

## साभार पोच

### माझा साखर जगाचा प्रवास

**लेखक : श्री. मोहन सदाशिव मराठे** * **प्रकाशक :** श्री. सी. गो. खांबेटे
**पृष्ठसंख्या :** १०२ * **स्वेच्छामूल्य :** २२५/- * **प्रथमावृत्ती :** २०१३
**संपर्कासाठी दूरध्वनी : श्री. मोहन सदाशिव मराठे,** ०२२-२६४६४३५१/९८१९९६४७६५
**श्री. सी. गो. खांबेटे :** -०२२-२६८३६९९४/९७५७४२९३३९१



Marathe Pratishthan

# सूत्र

- डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०)

आज रविवार सुट्टीचा दिवस होता. दुपारची जेवणं आटपून पेपर वाचता वाचता मालतीबाईंचा डोळा लागला. थोडीशी डुलकी काढून होते ना होते तो, रंगू भांडी घासून लुगडे सारखे करीत परत जायला निघाली होती.

''दार लोटून घे ग तेवढं जाताना...'' मालतीबाईंनी उगचाच सांगायचं म्हणून सांगितलं. त्यांना पक्कं माहीत होतं की रंगू दार उघडं टाकून तशी जाणार नाही. फारच चांगली, विश्वासू कामवाली त्यांना मिळाली होती. भांडी घासताना भांडी आदळ, आपटणे नाही. भांड्याचा आवाज नाही. भांडी तिच्यासारखीच स्वच्छ, लखलखीत असतात. कामंही पटापट उरकायची.

...मालतीबाई कित्येकदा म्हणायच्या, ''रंगू तुझ्या कामाचा झपाटा काही औरच. कामाला वाघ आहेस नुसती! तुझ्या हातापायांना जणू चाकंच बसविली आहेत.'' पण या स्तुतीने रंगू कधी हुरळून गेली नाही की तिच्या अंगावर मूठभर मांस चढलं नाही एखाद्या समंजस व्यक्तीप्रमाणे ती स्मितहास्य करायची.

...मालतीबाईंना नेहमी वाटायचं, नशिबात चांगली मोलकरीण मिळायलाही भाग्य लागतं. त्यांच्या शाळेतल्या इतर सहशिक्षिका मोलकरणींबद्दल नेहमी तक्रारीच्या सुरात बोलायच्या. पैसे वाढवून पाहिजेत. पगार केवढा घेतात. तरीही अंगावर उसने पैसे मागतात. कामाला वारंवार दांडी तसेच अडवणुकीत तरबेज. कधी गरजेपोटी किंवा काही विशेष कार्यक्रम घरी ठरविला असता, तिला कामाचे बजावले असतानाही ऐनवेळी अजिबात न न येता. फसगत करून दगा देणारी!

त्यात तरणीताठी, उफाड्याची कामवाली नखरेल असली तर विचारायलाच नको. तिच्या बाहेरच्या 'भानगडींच्या' व्यापातून जशी आणि जितकी सवड मिळेल तशीच ती कामे करणार. एका शिक्षक मैत्रिणीने सांगितलेल्या गोष्टीने तर मालतीबाई कमालीच्या अस्वस्थ झाल्या होत्या. मैत्रिणीचे दीर व जाऊ दोघेही नामांकित डॉक्टर. उत्तम सर्जन होते. व्यवसायात अतिशय व्यग्र असल्यामुळे कौटुंबिक कामाकडे लक्ष देणे त्यांना शक्यच नव्हते. इतके की त्यांच्या एकुलत्या एक मुलाला सांभाळण्यासाठी त्यांना दाई ठेवावी लागली. दुर्दैवाने ती दाई स्वार्थीच नाहीतर अप्रमाणिक निघाली. डॉक्टर दाम्पत्य सकाळ बाहेर पडल्यावर रात्रीच घरी परतत. म्हणजे दिवसभर त्या नोकराणीचेच घरी राज्य असायचं. नोकराणीची लफडीही अनेक. कधी ती एखाद्या प्रियकराला भेटीसाठी घरीच बोलवायची. मग त्या प्रणयात व्यत्यय नको म्हणून ती त्या मुलाला चक्क अफू पाजायची. दुसऱ्या एखाद्याबरोबर तिला नाटक-सिनेमा बघायला किंवा फिरायला जायचे असेल तर ती अफूची मात्रा पाच पट वाढवायची. म्हणजे तो बाळ पाच तास गुंगीतच झोपायचा. ...आणि त्या डॉक्टर जोडप्याला या प्रकाराचा अजिबात पत्ता नव्हता. पण सतत वाढत्या प्रमाणात मुलाला अफू खाऊ घातल्याने त्याच्यात मतिमंदत्व आले, तेव्हाच त्या जोडप्याला दाईचा हा दुष्टपणा लक्षात आला. त्यांनी तिची लगेच हकालपट्टी केली. ...पण फार उशीर झाला होता. कारण त्या मुलाला आयुष्यभर मतिमंद म्हणूनच जगावे लागणार होते.

...या पार्श्वभूमीवर मालतीबाई स्वत:ला भाग्यवती समजत होत्या. कारण त्यांच्या एकुलत्या एक माधवाला, विश्वासू, प्रामाणिक रंगूने कसे उत्तम सांभाळले होते. आता माधव मोठा होऊन आणि शाळेत हुशार विद्यार्थी म्हणून नावाजत होता.

गृहसौख्य, स्त्रीसौख्य, पतिसौख्य, वाहनसौख्य तसे मोलकरीण सौख्य मालतीबाईंच्या पत्रिकेत लिहिले असावे.

मालतीबाईंचा विवाह झाला आणि त्यांच्या पतींनी वसंतरावांनी मोलकरीण कामाला ठेवली. तोपर्यंत ते स्वत:च हाताने काम करायचे. मालतीबाई नोकरी करणाऱ्या होत्या आणि पुढे संसार वाढणार होता. म्हणून त्यांनी लग्न झाल्या-बरोबर कामाला मोलकरीण लावली होती. मालतीबाईंचा विवाह झाला आणि तेव्हापासून रंगू आजतागायत बारा वर्षे त्यांच्याकडे काम करते.

रंगू दिसायला चारचौघींपेक्षा उजवी होती. स्वच्छ आणि नीटनेटकी असायची. उभार बांधा, निमुळती मान, गळयात काळ्या मण्यांचं गंठण, मोठं कपाळ, वर्णाने उजळ, केसांचा भला मोठा घट्ट अंबाडा. रंगूच्या विपुल केशसंभाराला आकडे आणि पीना तोलून धरत, कामं करताना हा अंबाडा कधी सुटायचा नाही. रंगू तरतरीत, चपळ होती. तिचे अंग वेताच्या छडीप्रमाणे लवत असे. काम करतानाच्या रंगूच्या हालचाली सफाईदार आणि मोहक दिसायच्या.

रंगू नऊवारी लुगडे नेसायची. त्यामुळे तिचे बांधेसूद शरीर उठावदार दिसायचे. मात्र एक विसंगती होती. तिचे ब्लाऊज मोठ्या गळ्याचे असत. बाहेर वावरताना कायम डोईवर, अंगावर पदर घेतलेला असे. पण घरात आल्यावर कामाला सुरुवात करण्यापूर्वी ती ओचे, पदर खोचीत असे. त्यामुळे फरशी पुसताना तिच्या पाठीच्या उघड्या भागावर असलेल्या काळा ठसठशीत तीळ डोळ्यात भरायचा.

सूर्यास्तानंतर काळोख्या रात्रीच्या प्रारंभी जसा शुक्रतारा आकर्षक दिसतो तसा तिच्या गोऱ्या पाठीवरचा तो तीळ लक्ष वेधून घेत असे. त्या तीळावरून मालतीबाईंना त्यांनी केव्हातरी वाचलेले 'तीळमाहात्म्य' आठवायचे. पाठीवर असलेला असा तीळ त्या व्यक्तीची तीव्र कामेच्छा दर्शवितो. अशा व्यक्ती पुष्कळ शरीरसुख उपभोगणाऱ्या असतात असे त्यात लिहिले होते.

दिवसभर राबराब राबणारी रंगू मालतीबाईंनी कधी चिडलेली, कावलेली किंवा थकलेली पाहिली नाही. तिचा चेहरा कायम आनंदी आणि शांत, सदा हसतमुख, समाधानी आणि टवटवीत! इतके कष्ट करणाऱ्या रंगूची प्रसन्नता मालतीबाईंना कोड्यात टाकायची.

...मालतीबाईंच्या घराजवळच झोपडपट्टी होती. त्यात रंगू राहायची. मालतीबाई तिसऱ्या मजल्यावर राहायच्या. त्यांच्या बेडरूमला लागूनच बाल्कनी होती. बाल्कनीत उभे राहिले की



Marathe Pratishthan

झोपडपट्टीतील दृश्ये दिसायची. त्यांना श्रीमंत-गरीब यांच्यातील खोल दरी जाणवायची. मालतीबाई संवेदनाशील होत्या. झोपडपट्टीतील जीणे त्यांना दुःखदायक वाटे. शेंबडी, घाणेरडी, भुकेने रडणारी लहान मुले. भांडणारी, शिव्यादेणारी, जुगार, सोरट खेळणारी, हिरोसारखी नटून स्टाईल मारणारी, बायकामुलींकडे पाहून चेकाळणारी तरुण मुले, रेशनसाठी घासलेटची गॅलने घेऊन लगबगणाऱ्या बाया, रस्त्यावर सतत थुंकणारी म्हातारी माणसं, खरुज खाजविणारी, अंघोळीच्या वेळी आकांताने रडणारी मुले पाहिली की त्यांच्या हृदयात कालवाकालव होई. त्यांना वाटे. आपला पांढरपेशा, शिकलेला, सुसंस्कृत समाज चार भिंतीत सुखी राहतो, ह्यांना कोण सुधारणार? आपण वर्गात मारे पोपटपंची करीत असतो. या लोकांसाठी काहीतरी केले पाहिजे अशी तळमळ त्यांना वाटे.

झोपडपट्टीतही टी.व्ही. आहेत. व्ही.सी.आर आहेत. पण सिनेमे, ब्लू फिल्मस, त्यातील वासना चाळविणारे नाच आणि गाणी पाहण्यात हे लोक मश्गुल होतात. मात्र त्यांना टी.व्ही वरील 'फॅमिली प्लॅनिंग' ची माहिती, गर्भनिरोधनाची साधने ह्याच्याविषयी आस्था नसते. कुटुंब-कल्याण त्यानां नको असते का? एका मुलाला जेथे खायला घालायची मारामार तिथे मुलांची सारखी पैदास हे लोक निर्माण करत असतात का? कशासाठी? मालतीबाईंना विलक्षण चीड वाटायची. त्यांचे हित कशात आहे हे त्यांना समजावले पाहिजे. वसंतरावाजळ त्यांनी हा विचार बोलूनही दाखविला. त्यावर वसंतराव म्हणाले, ''तू समाजसेवा करण्याच्या भानगडीत पड नकोस. तू त्यांचा उद्धार करायला जाशील पण त्यांना ते आवडणार नाही. 'असंगाशी संग प्राणाशी गाठ...' आपण जवळच राहतो. सांभाळून राहावं.''

...वसंतरावांना वाटलं आपल्या स्पष्ट बोलण्याने मालतीबाई नाराज झाल्या आहेत. त्यांनी त्यांच्या खांद्यावर हात किंचित दाबून मृदू स्वरात सांगितलं, ''हे बघ मालू, तू जास्त वेळ या बाल्कनीत उभी राहून मनाला त्रास करून घेत जाऊ नकोस.'' वसंतराव खुशीत असले म्हणजे मालतीबाईंना 'मालू' म्हणायचे.

...मात्र रंगू त्याला अपवाद होती. रंगूने दोन मुले झाल्यावर मालतीबाईंना स्वतःहून सल्ला विचारून कुटुंब नियोजन केले होते. ह्याबाबतीत तिने नवऱ्याचेही खुबीने मन वळवून घेतले होते.

एरव्ही शांत, सोज्वळ असलेली रंगू तोंडाने फटकळ होती. कोणी टारगटांनी चेष्टामस्करी केली. अवाजवी छेडखानी केली. अंगाशी लगट केली तर ती कडक लक्ष्मीचे रूप धारण करी. तिच्या शुद्ध चारित्र्यामुळे ती झोपडपट्टीतही उजळमाथ्याने निर्भयतेने राहात होती.

...वसंतराव घरी असले की, झोपडपट्टी दिसणारी बाल्कनी बंद करून टाकायचे. पण ते घरी नसले की, मालतीबाई अधूनमधून बाल्कनीत उभ्या राहायच्या, त्यांना वाटायचे जगण्याच्या ह्या वास्तवाला कशाला नाकारायचे? जीवनाची ही पण एक बाजू आहे आणि ती सत्य आहे.

...परवा अशाच त्या तिन्हीसांजेला देवापुढे दिवा लावून, रामरक्षा म्हणत होत्या. तोच त्यांना रडण्या-ओरडण्याचा मोठा आवाज ऐकू आला. त्या बाल्कनीत बघायला आल्या. त्यांना विलक्षण दृश्य दिसले. क्षणभर त्यांचा विश्वास बसेना. रंगूचा नवरा रंगूला वाटेल तसा मारीत सुटला होता. तिचे लांब, मोठे केस आसुडत होता. रंगू त्याला प्रतिकार न करता मुकाट्याने एखाद्या गरीब गायीप्रमाणे मार सहन करीत होती. रंगूच्या नवऱ्यात 'सैतान' संचारला होता जणू त्याला अडवायची कोणाला हिंमत होत नव्हती. रंगूची सासू एखाद्या 'स्थितप्रज्ञा' प्रमाणे पाहत होती. तिला ह्यात 'वावगे'आणि 'नवे' काही वाटत नसावे. किंबहुना पुरुषाने अधूनमधून आपला 'पुरुषी हक्क' बजावलाच पाहिजे, त्यातच त्याचा 'पुरुषार्थ' असतो आणि त्यामुळे बायकाही एखाद्या जनावराप्रमाणे सुतासारख्या सरळ राहतात. आजूबाजूचे लोक बघ्याची भूमिका घेऊन पाहात होते. त्यांनाही त्यात काही विशेष वाटत नव्हते.

रंगूच्या नवऱ्याची अमानुष मारहाण मालतीबाईंच्याने पाहवेना आणि दार बंद करून स्वस्थ बसावेसे वाटेना. त्यांच्या मनात रंगूच्या नवऱ्याचा संताप आला आणि त्यांच्यात कुठून तरी एकदम अवसान आले आणि त्या वीजेसारख्या घराबाहेर पडल्या, मारणाऱ्या रंगूच्या नवऱ्याचा हात त्यांनी घट्ट पकडून ठेवला. आजूबाजूच्या लोकांना दम भरून विचारले, ''काय तमाशा आहे का पाहायला? एक राक्षस दुबळ्या बाईवर हात टाकतो आणि तुम्ही पाहत बसता? दगड आहात की माणूस?''

...मालतीबाईंच्यातले दुष्टांचा संहार करणाऱ्या देवीचे उग्ररूप पाहून रंगूच्या नवऱ्यातले पिशाच्च अदृश्य झाले. त्याची नशा खाडकन उतरली आणि तो भानावर आला. आपली चूक समजून त्याने खाली मान घातली.

...मालतीबाई घरी आल्या. फ्रीजमधले पाणी त्यांनी गटागटा प्यायले. आता त्यांना अगदी हलकेसे वाटू लागले. मगाशी मनावर आलेला ताण उतरला. त्यांच्यातल्या धैर्याचा साक्षात्कार प्रथमच त्यांना झाला होता. त्या अंथरूणावर येऊन पडल्या. वसंतराव बाहेरगावी गेले आहेत, ह्याचे त्यांना हायसे वाटले. एरव्ही लवंगी मिरचीसारखी असणारी रंगू नवऱ्यापुढे 'बापुडीदीन' होते याचे त्यांना वाईट वाटत होते. बाईने अबला म्हणून नवरेशाहीचा जुलूम का सोसायचा? या प्रश्नांच्या आवर्तात त्यांची विचारशक्ती गुरफटून गेली.

दुसऱ्याच दिवशी सकाळी रंगू कामाल आलेली पाहताच मालतीबाईंना आश्चर्य वाटले. एखाद्या मोठ्या आजारातून उठल्यासारखी ती म्लान आणि निःस्तेज दिसत होती. आणि तरीही चेहऱ्यावर कुठेतरी एका वेगळ्याच तृप्तीची गहिरी छटाही दिसत होती.

मालतीबाईंनी म्हटले, ''अगं तुला काल रात्री एवढा मार बसला. तुझी तब्येत बरी आहे ना? आज विश्रांती घ्यायची. अंग ठणकत असेल.'' मालतीबाईंनी रंगूला अंगदुखी थांबण्याची औषधाची गोळी दिली आणि सुंठ घातलेला गरम चहा दिला.

मग त्यांनी रंगूला विचारले, ''हा नवरा एवढा तुला बेदम मारतो, कशाला राहतेस त्याच्याजवळ? सोडून दे त्याला तू 'कमावती' आहेस. मुलांचं तुझं सहज भागेल. मी तुला सर्व मदत करायला खंबीर आहे. पण नवऱ्याचा हा अत्याचार सहन करू नकोस. व्यसनी, मारकुट्या नवऱ्यापासून घटस्फोट घे.''

''बाई तुम्हाला खरं सांगितलं तर वंगाळ नाही ना वाटायचं?'' रंगूने पलंगावर विसावलेल्या मालतीबाईंच्या नजरेला नजर देत म्हटलं.

मालतीबाईंची उत्सुकता वाढली. परंतु त्याच-वेळी इतके दिवस त्यांना वाटत असणाऱ्या रहस्याची उकल होणार हे कळून त्यांचं मन सुखावलं.

त्या म्हणाल्या, ''रंगू खुशाल सांग आणि



Marathe Pratishthan

सगळं खरं सांग. तू इतकी वागण्याबोलण्यात स्पष्ट आहेस की तू केलेली कोणतीही गोष्ट निदान मला तरी वंगाळ कधीच वाटणार नाही. सगळे सविस्तर सांग.''

आणि रंगू परवाच घडलेली घटना डोळ्यांसमोर आणून सांगू लागली. बोलताना तिचा हात सहजच स्वत:च्या प्रथम उजव्या आणि नंतर डाव्या गालावर फिरला.

''बाई, तुम्हाला माझ्या उजव्या गालावर काळा निळा डाग दिसतोय? माझ्या घरवाल्यानं संध्याकाळी माझ्या थोबाडात मारलं ना त्याचा आहे तो.. पण माझ्या डाव्या गालावर बघा. लालसर खूण दिसतेय. ही कशाची माहित्येय? त्याच मध्यरात्री माझा घरधनी परतल्यावर त्यानं मला मिठीत घट्ट आवळलं.

.. मी फार नाराज होते. मला तो नजरेसमोरही नकोसा झाला होता. त्याचा स्पर्शही मला नकोसा झाला होता. त्याला ढकलून देण्याची मला इच्छा झाली... पण मला विरोध करण्याची संधीच त्याने दिली नाही. त्यानं मला इतकं घट्ट आवळलं की त्यामुळे माझं शरीर सुखावलं. मुका घेताना त्यानं माझा डावा गाल चक्क चावलाच. त्याच्या दातांची खूण माझ्या डाव्या गालावर उमटली.

...अन् त्या दोन क्षणातच पुन्हा मी त्याची झाले. त्यावेळी त्यांनी मला खूप खूप सुख दिलं. मला जे फार आवडायचे ते त्यांनी त्या रात्री मला पोटभर दिलं. रंगू लाजत म्हणाली.

दिवसभर मी काबाडकष्ट करते. दुपारी ढेकर येइतो पोटभर जेवते. मध्यरात्री, मला तसंच शरीरसुख हवं असतं... आणि तो ते माझी तृप्ती पूर्ण होईतो देत असतो....!

त्या खुशीत मी सर्व कष्ट आणि त्यानं दारू पिऊन केलेली मारहाणही विसरते.

...दारू पिऊन कधी कधी तो धिंगाणा करतो. तो तमाशा तुम्हा सर्वांना दिसतो. मला त्याची शरम वाटते. पण तरीही मला माझ्या घरधन्याशी फारकत घ्यावीशी वाटत नाही.

कारण अशा वेळी शुद्धीवर आल्यावर त्याला वाईट वाटते. केल्या तमाशाची लाज वाटते. मग माझा राग काढण्यासाठी तो नवी साडी मला घेऊन देतो. अजीजीने माझी मिनतवारी करतो. पुन्हा असे करणार नाही म्हणून मनापासून शपथ घेतो. पश्चात्तापाने तो नुसता पोळून निघतो. मग माझ्यावर असलेली त्याची माया उरी दाटून येते. प्रेमाने तो व्याकुळ होतो. गयावया करतो. त्याची कासाविशी मला साहवत नाही. त्याच्या प्रेमाला नकार मी देऊच शकत नाही. त्याचे मन मला समजते. माझे त्याला, आम्हा दोघांचा एकमेकांवर लई जीव आहे....

.....माझ्या नवऱ्याचं व्यसनी आणि दुष्ट स्वरूप लोकांना दिसतं. त्यांना दारू पिऊन केलेली मारहाण दिसते.

.....पण मध्यरात्री नंतर तो जेव्हा झाल्या चुकीच्या पश्चात्तापाने शुद्धीवर होऊन परततो तेव्हा माझी कशी आणि किती मनधरणी करतो ते काही लोकांना दिसणं शक्य नाही.

''बाई, तुम्हाला माझ्या उजव्या गालावरचा काळा निळा डाग दिसला पण डाव्या गालावरची लाल खूण दिसली नाही. ती त्याने मला दिलेल्या सुखाची आहे. शेवटी त्याच्याकडून मिळणाऱ्या सुखदु:खाचं देणंघेणं फिटल्यावरही माझ्याजवळ उरतं ते फक्त सुखच!

.....त्याची अभद्र मारहाण जितकी खरी त्यापेक्षा शेकडो पटींनी त्यांनी केलेली प्रीतीची बरसात मला सुखावते हेही खरे आणि म्हणूनच मी सगळं काही सोसून त्याच्याशी संसार करते त्यामुळे त्याला सोडण्याचा ईचार माझ्या मनात कधीही येत नाही.''

नेहमीप्रमाणे रंगू दुसऱ्या कामाला गेली... पण माझे मन आता माझ्या 'सुखी' जीवनाचा विचार करू लागले. खरंच, माझे जीवन किती 'सुखी' आहे? ..सगळं कसं आयुष्यात वेळच्या वेळी झालं...मिळालं. दु:खाचे प्रसंग क्वचितच तेही 'सुख दुखताय' या म्हणीप्रमाणे... शाळाकॉलेजात मी रमले. परंतु काचेच्या पेटीतील सुंदर चालल्या बोलल्या बाहुलीप्रमाणे... वाहवा ऐकली ती दुरूनच.

.....पुन्हा टारगटांनी त्यांच्या लालसी इच्छा पत्राने कळविल्या, त्या केवळ कागदावरच. सर्व काही मर्यादाशील, पदवीधर झाले. अध्यापनाची पदवीही संपादन केली. गुणवत्तेमुळे शिक्षिकेची नोकरीही लागली आणि लवकरच स्थळाने पसंत केल्यामुळे लग्नही झाले. पतीही मनासारखा मिळाला. समंजस, उदार अगदी अनाग्रही. वंशाचा दिवा लाभल्यावर मला पुन्हा बाळंतपणाचा त्रासही दिला नाही.

मारहाण तर दूर राहो पण माझ्या पतीने कधी अपशब्दही उच्चारला नाही.

खरंच सुखी जीवनाचा मूलमंत्र मला लाभल्यासारखे दु:खाचा स्पर्शही नसलेले. जीवन मी जगत आले, क्वचितच असे भाग्य लाभते एखाद्या व्यक्तीला!

सुखाच्या तंद्रीत असताना मालतीबाईंना एकाएकी, नुकतीच रंगूने सांगितलेली वास्तवता जाणवली. सुखी जीवनाच्या कल्पनेला एकाएकी ठेच लागली. मन भळभळून वाहू लागले. उलट्या दिशेने...

खरंच माझे जीवन सुखी आहे का?

.....मालतीबाई सुखाच्या व्याख्येचा अधिक खोल विचार करू लागल्या.

जी व्यक्ती सदैव सावलीतच राहिली, सुखाच्या कोशात निरंतर वाढत आली तिला मिळते ते परमोच्च सुख असते काय? त्या नियमितपणे चोवीस तास चालू असलेल्या पाण्याच्या नळाप्रमाणे मिळणाऱ्या सुखाची उत्कटता बोथट होत नाही काय?... ज्याला कधी उन्हात जावेच लागले नाही त्याला सावलीचे कसे आणि किती काळ कौतुक वाटणार?

.....उन्हात तासन् तास भाजून निघाल्यानंतर एखाद्या वृक्षाच्या छायेत काही मिनिटे विसावल्यावर मिळणारे सुख किती अप्रूप वाटत असते.

.....ज्याला दु:खाची झळच लागली नाही त्याला सुखाची कळ सापडली असे कसे म्हणावे? जो कधी रागावलाच नाही त्या पतीच्या प्रेमाचे कौतुक किती काळ चघळायचे?

...थोड्या विचारानंतर त्यांना असे वाटू लागले की ज्याला शत्रू नाही त्याला मित्रत्वाचे मूल्य कसे समजणार? ज्याला उपास कधी घडला नाही, त्याला नियमितपणे मिळणाऱ्या पोटभर जेवणाचे काय अप्रूप वाटणार? जी व्यक्ती तहानेने व्याकुळ झाली नाही तिला पोटभर पाणी प्यायलाचे समाधान कसे मिळणार?

.....मालतीबाईंना वाटले आपल्या जीवनात सुख शांतपणे वाहात आहे. त्याचा आनंदही मर्यादीत झाला आहे. त्यापेक्षा रंगूच्या जीवनत काही वेगळ्याच उन्मत्त सुखदु:खाची जाणीव आहे. तिला कधी कधी नवऱ्यापासून पराकोटीचे दुख: आणि मानहानीही सोसावी लागते. पण

Marathe Pratishthan

त्याचबरोबर त्या दु:खाला ग्रासून टाकणारा सुखाचा महापूरही तिच्या जीवनात येऊन जातो. तिचे दु:ख जितके मोठे त्याहून त्यानंतर मिळणारे सुख शतपटीने उत्कट! .....ती उत्कटता आपल्याला मिळणे अशक्यच!

रंगूच्या जीवनातील दु:ख भोगल्याचा अवांछनीय प्रसंग आपल्या जीवनात उगवला नाही आणि उगवणारही नाही, ह्याचे त्यांच्या मनाला एक साजूक समाधान वाटले!

पण लगेच त्यांच्या मनात विचार आला की, रंगूच्या वाट्याला अधूनमधून येणारा सुखाचा महापूर आपल्या जीवनात कधीच येणार नाही.

त्यांच्या मनाला या गोष्टीची अधिकच खंत वाटली. रंगूच्या संसाराचे 'सूत्र' आपल्याला या जन्मी गवसणार नाही, याचे त्यांना अधिक दु:ख वाटू लागले.

मालतीबाईंच्या जीवनातील सुखाच्या साजून समाधानापेक्षा, रंगूच्या जीवनात अधूनमधून येणारा सुखाचा महापूर, आपल्याला या जीवनात कधीच मिळणार नाही याची खंत आणि दु:ख त्यांना त्याक्षणी अधिक क्लेशकारक वाटले!!

**- डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**
(पृ.१२०) ८/१३, सहकारनगर,
वडाळा, मुंबई ४०००३१
फोन नं. : ०२२-२४१५०८८९

# प्रतिष्ठान वृत्त

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

शुक्रवार दिनांक २२ नोव्हेंबर २०१३ संध्याकाळी ५ वाजता सुलभाताईंच्या निवासस्थानी मराठे प्रतिष्ठानची बैठक भरली. अध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस, श्री. मोहनराव मराठे, श्री. वा. ग. मराठे, सौ. वृषाली मराठे, श्री. हेमंत मराठे, श्री. शैलेंद्र मराठे, श्री. सी. गो. खांबेटे, सौ. प्रतिभा मराठे, सुलभाताई, डॉ. सौ. सुलभा मराठे इ. कार्यकारिणीचे सदस्य उपस्थित होते.

अहवाल वाचन झाले. पत्रव्यवहार वाचला. श्री. कालिदास मराठे, गोवा आणि विश्वनाथ काशिनाथ मराठे, रावळपाडा, दहिसर यांची पत्रे वाचण्यात आली. हितगुजविषयी चर्चा झाली. हितगुजचा छपाई खर्च मंजूर करण्यात आला. श्री. वा. ग. मराठे सपत्नीक उपस्थित होते. त्यांनी ५१,०००/- देणगी नॅनो-टेक्नॉलॉजीसाठी शैक्षणिक मदत म्हणून दिली. सर्व सदस्यांनी टाळ्या वाजवून वा. ग. चे अभिनंदन केले.

सुलभाताईंच्या आदरातिथ्याने, चहा-फराळाने सभेची सांगता झाली.

## सहवेदना

कै. सौ. माधुरी प्रमोद मराठे (पृ.७६७) यांचे दीर्घकालीन आजाराने अहेवपणी नुकतचे निधन झाले. त्यांच्या मागे पती श्री. प्रमोद कृष्ण मराठे आणि दोन मुले आहेत.

कै. सौ. माधुरी यांचे पती श्री. प्रमोद कृष्ण मराठे हे प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळावर अनेक वर्षे कृतीशील सभासद होते.

आपली दिवंगत पत्नी सौ. माधुरी हिच्या स्मरणार्थ श्री. प्रमोद मराठे यांनी ५०००रु. शैक्षणिक शिष्यवृत्ती देणगी म्हणून दिले आहेत. त्याबद्दल आभार.

कै. सौ. माधुरी प्रमोद मराठे यांना मराठे प्रतिष्ठानद्वारा भावपूर्ण श्रद्धांजली!

## वाचकांचा पत्रव्यवहार

जूनचा हितगुज फार पूर्वीच पोहोचला. हितगुजचा पहिल्यापासून वाचक व सगळे अंक जतन करून, शिवाय प्रचार, आचार करणारा मी एक कुलबांधव.

आपला अंक चांगला आहे. मी सर्वसाधारण वार्षिक सभेला येऊ शकलो नाही त्याबद्दल क्षमा असावी. आपल्या उत्साहपूर्ण कार्याला मी धन्यवाद देतो व असेच सांस्कृतिक समृद्धीचे काम आपणाकडून सदैव होत राहो अशी गोपालकृष्णाची प्रार्थना करतो.

**- ज. गो. मराठे,** ३०४ ॐरिद्धीसिद्धी अपार्टमेंट, आगाशी - ४०१३०१

## पुण्यस्मरण

**कै. जनार्दन प्रभाकर विद्वांस आणि कै. निर्मला जनार्दन विद्वांस यांना भावपूर्ण श्रद्धांजली**

**प्रेषक : अशोक यशवंत विद्वांस, पार्ले**



Marathe Pratishthan

# छोटा गंधर्व या नावाची गोष्ट

महाराष्ट्रातील गाजलेले गंधर्व म्हणजे सवाई गंधर्व, बालगंधर्व, कुमार गंधर्व आणि छोटा गंधर्व. ह्या सर्व गंधर्वांना उदंड प्रेम लाभले. लोकमान्य टिळकांनी बालगंधर्व ही पदवी दिली, त्या काळातील एक थोर पुढारी श्री. दादासाहेब खापर्डे यांनी सवाई गंधर्वांना ही पदवी दिली आणि गुरू कलमठस्वामी ह्यांनी कुमार गंधर्वांना ही पदवी दिली. पण छोटा गंधर्वांच्या ह्या पदवीची गोष्ट वेगळीच आहे.

बालमोहन संगीत मंडळीचे मालक श्री. दामूअण्णा जोशी सातारला गेले होते. तेथील 'कोरे' येथील 'सौदागर नागनाथ गोरे' ह्या दहा वर्षांच्या मुलाला घेऊन आले. त्याच आवाज अतिशय गोड होता. दामूअण्णांनी नाटकाची जाहिरात करताना सौदागर या मूळ नावाला छोटा गंधर्व असे विशेषण जोडले आणि तेव्हापासून ते छोटा गंधर्व झाले. अर्थात पुढे त्यांनी खूप अभ्यास केला. खूप गुरूंकडून उत्तम तालीम घेतली. स्वतः सुंदर बंदिशी लिहिल्या. त्या आपल्या शिष्यांना शिकवल्या. स्वत:ची गायनशैली विकसित केली. रसिकांनी त्यांना भरभरून प्रेम दिले.

प्रथम स्त्री भूमिका करण्यासाठी लुगडे (साडी) नेसायला हा दहा वर्षांचा मुलगा तयार होईना. मग कंपनीचे मालक असलेले श्री. दामूअण्णा जोशी यांनी स्वत: नऊवारी साडी नेसून दाखविली तेव्हा छोटा सौदागर कसाबसा साडी नेसावयास तयार झाला. अशी मजेदार गोष्ट पहिलीच स्त्री भूमिका करताना घडली.

तर अशा ह्या पं. छोटा गंधर्वांची अनेक नाटके आणि अनेक नाट्यपदे खूप गाजली. त्यांच्या अनेक कॅसेट निघाल्या. त्यांनी रंगवलेली कृष्णाची भूमिका आणि गाणी रसिकांची दाद घेऊन गेली आणि अमर झाली. शास्त्रीय संगीतावरही त्यांचा अधिकार मोठा होता. एकसष्टी समारंभांनंतर रंगभूमीमधून त्यांनी जरी निवृत्ती घेतली तरी नंतर भरपूर विद्यादान केले आणि आपल्या आवडीच्या अध्यात्म या विषयाचे खूप वाचन, मनन, चिंतन करून जपजाप्य करण्यासाठी आपला वेळ दिला.

**- सौ. वर्षा नंदलाल गोडबोले (पृ.१२९)**
संचालिका, सरगम संगीत विद्यालय,
रघुनंदन, ४५, मयूर कॉलनी, कोथरूड, पुणे ३८ फोन : ०२०-२५४३९६४ मोबाईल : ९८२२७५४६४०

# आई

*आई असते म्हणून सारे निभावते*
*जग हे सारे तीच दाखवते*
*मान अपमान झेलून मुलांना मोठे करते*
*पंख फुटले पिल्लांना की जातात दूर निघून*
*मनात शंका तिच्या, पाहतील की नाही मागे वळून!*
*कधी कधी हसता हसता जेव्हा मन अचानक भरून येते*
*तेव्हा तिच्या कुशीत मनमोकळे रडता येते*
*ती बाजूला घेऊन समजावते*
*चारचौघात ती कधी अपमान नाही करत*
*ती सांगते ते बरोबर असते हे आपल्याला उशीराने कळते*
*काळा असला गोरा असला, ठेंगणा, उंच अथवा कुरुप*
*वाढवताना त्याला ती पाहते त्यात बाळकृष्णाचं रूप*

**- श्रीमती मृदुला मराठे, (पृ. २७७)**
'कैलास' विष्णूनगर, नौपाडा, ठाणे ४००६०२

# नांदा सौख्यभरे

सौ. अनुपमा अशोक दाते (पूर्वाश्रमीच्या सुधा शिवराम मराठे, पृ. १२० मराठ्यांची माहेरवाशीण) यांची सुकन्या चि. सौ. कां. धनश्री (एल.एल.एम) हिचा शुभविवाह

चि. भाग्येश पांडुरंग जोशी (एल.एल.एम.)

याजबरोबर दिनांक ३० नोव्हेंबर २०१३ सकाळी १० वाजून ४२ मिनिटांनी गोरेगाव येथील लँडमार्क मॅरेज पार्टी हॉल येथे थाटामाटात संपन्न झाला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा वधू-वरांना अनेक शुभाशीर्वाद!

Marathe Pratishthan

# संवाद कुलबांधवांशी

नमस्कार बंधूभगिनींनो,

सन २०१३ ते २०१६ या कालावधीसाठी माझी मराठे प्रतिष्ठानच्या कार्यवाह पदावर निवड झाली आहे. गेली बारा वर्षे सहकार्यवाह म्हणून प्रथम श्री. वि. के. मराठे यांच्या हाताखाली व नंतर श्री. मोहन मराठे यांचे हाताखाली बराच अनुभव मिळाला. दोघांकडूनही बरेच शिकता आले. आता कार्यकारिणीने कार्यवाह म्हणून माझ्यावर मोठी जबाबदारी टाकून विश्वास दाखविला आहे.

मराठे प्रतिष्ठानचे कार्य असेच उत्तरोत्तर वाढवायचे असेल, तर मला आपल्या सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. व त्यासाठी मला आपणाशी संवाद साधणे फारच गरजेचे आहे. त्यामुळे यापुढे प्रत्येक अंकामध्ये मी आपल्याशी संवाद साधणार आहे.

प्रथम मी आपणा सर्वांना कळकळीची विनंती करतो की हितगुज, जो आपल्या घरी येतो तो घरातील सर्वांनी वाचणे गरजेचे आहे. लहान मुलांनी देखील हितगुज वाचावा यासाठी आपण मोठ्यांनी त्यांना प्रोत्साहित करावे. तसेच आपल्या कुटुंबातील-घरातील, सुखदु:खाच्या घटना वेळच्यावेळी जरूर कळवाव्यात. मुलांचे यश त्यांना स्वत:ला पत्र पाठवून कळविण्यास सांगावे. मराठे प्रतिष्ठानच्या कार्यक्रमांमध्ये कुटुंबातील प्रत्येकाने उपस्थिती ठेवावी. यामुळे आपणा सर्वांना हितगुजबद्दल व आपल्या कुलबांधव-भगिनींबद्दल आत्मियता वाढेल.

आपली गावे-शहरे ही मराठे प्रतिष्ठानची एक-एक शाखा आहे असे मी मानतो. त्यामुळे यापुढे आपण गावात राहत असाल तर गावातील व आजूबाजूच्या गावातील आणि शहरामध्ये राहत असाल तर आपल्या जवळपास राहत असलेल्या मराठे कुटुंबियांशी कायम संपर्कात राहा. एकमेकांच्या चांगल्या-वाईट प्रसंगामध्ये सहभागी व्हा. कारण आपण सर्व म्हणजेच मराठे प्रतिष्ठान होय. तेव्हा आपण प्रत्येकाने संपर्कात राहणे हे आद्य कर्तव्य मानावे. बरेच जण म्हणतात, आम्हाला वेळ नसतो. त्यावर माझे मत असे आहे की, वेळ हा काढावा लागतो. जर आपण प्रत्येकाने थोडा-थोडा वेळ काढला तर आपला संपर्क फारच चांगला होऊ शकतो. प्रत्येकाने याचा अनुभव घ्यावा व त्यानंतर आपले मत आम्हाला जरूर कळवावे. अनुकूल अथवा प्रतिकूल अशा सर्व मतांच्या प्रतिक्षेत मी आहे.

माझी अशी अपेक्षा आहे की ज्याप्रमाणे पुणे व गोवा येथे दरवर्षी मेळावा घेतला जातो त्याचप्रमाणे इतर शहरांमध्येदेखील तेथील कुलबांधव-भगिनींनी पुढाकार घ्यावा व छोटे छोट विभागवार मेळावे आयोजित करावेत. त्यासाठी वेगवेगळे विषय घ्यावेत. तरुणांना आवर्जून सामावून घ्यावे. जवळपासच्या गावातील अथवा शहरातील कुलबांधवांना बोलवावे. आम्ही कार्यकारिणी सदस्य जरूर या मेळाव्यास हजर राहू. याचा वृत्तांत हितगुजमध्ये आल्यानंतर इतरांना त्यातून स्फूर्ती मिळेल, तेव्हा यापुढे प्रत्येकाने लहान-थोर सर्वांनी संपर्क वाढविण्यास सुरुवात करावी. व आपले मराठे प्रतिष्ठान मोठे करावे. आपल्या प्रतिक्रियांच्या प्रतीक्षेत...

**- श्री. हेमंत अरुण मराठे (पृ. २१)**
कार्यवाह, मराठे प्रतिष्ठान
बी-१०२, शांतीनाथ अॅव्हेन्यू, चक्रधर नगर, नालासोपारा (प.), जि. ठाणे ४०१२०३
फोन : ९२२०६९९९५७/९८२२८४७१२०



Marathe Pratishthan

# मेसर्स. वामन शंकर मराठे प्रा. लि.

अभिवादन, १ला मजला, शिवाजी पथ, ठाणे ४००६०२
फोन नं. : ०२२-२५४२३३३७/२५४२२४९४

# वामन शंकर मराठे ज्वेलर्स

१,४ पूजाविहार को. ऑप. हौ. सो.,
राम मारुती रोड, ठाणे (प.)- ४०० ६०२
फोन नं. : ०२२-२५४२४७८६/२५५५५५५५

# वामन शंकर मराठे ज्वेलर्स

१, अंकिता, नवघर रोड, मुलुंड जिमखान्यासमोर,
मुलुंड (पू.), मुंबई - ४०० ०८१.
फोन नं. : ०२२-२१६३५७६७

E-mail : vsmarathejewellers@gmail.com
Website : www.vsmarathe.com


मराठे परिवाराला नवीन वर्ष सुखसमृद्धीचे व समाधानाचे, उत्तम आरोग्याचे आणि भरभराटीचे जावो, ह्या शुभेच्छा!

BOOK POST

If undelivered,
please return to

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१


त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल : (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in ◉ वेबसाईट : www.marathepratishthan.org


Marathe Pratishthan